दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -७६ | शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-76 | Friday, Dt.21 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## जिल्हाधिकाऱ्यांचा दणका, भूसंपादनात २४१ कोटी ६२ लाख रुपयांचे बनावट आदेश निर्गमित करून ७३ कोटींचा अपहार करणाऱ्या

# भ्रष्ट सहाय्यक महसूल अधिकारी संजय हंगे, पांडुरंग पाटील आणि कंत्राटी कर्मचारी त्रिंबक पिंगळे, अविनाश चव्हाण, शेख अजहर यांना केले निलंबित !

बीड प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भूसंपादन कार्यालय, जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड या कार्यालयांना भेट देऊन सदर कार्यालयातील सन २०२५ चे संचिकांची तपासणी केली असता, तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून लवाद आदेशाचे कव्हरिंग लेटरवर १५४ प्रकरणात जवळपास २४१ कोटी ६२ लक्ष रुपयाचे मागील कालावधीतील बनावट आदेश निर्गमित झाल्याचे दिसून आले. जे जायकवाडी प्रकल्प भूसंपादन कार्यालय व उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड यांना १ ते ५ महिन्यानंतर प्राप्त झाले. सदर आदेश पारित करतांना सुनावणीशी संबंधित परिपूर्ण संचिका, कोणतेही रजिस्टर, कार्यविवरण नोंद वहितील नोंदीबाबतची माहिती भूसंपादन कार्यालयात उपलब्ध नव्हती. सदर आदेशाचे अनुषंगाने संबंधित कार्यालयाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडून ७३ कोटी निधी प्राप्त करून संबधित भूसंपादन अधिकारी यांचे मार्फत वितरीत झालेला असल्याने भूसंपादन कार्यालय, जायकवाडी प्रकल्प कार्यालय, व उपविभागीय अधिकारी कार्यालय बीड या कार्यालयातील शासकीय कर्मचारी व विधीज्ञ यांनी संगनमताने कट कारस्थानाव्दारे शासनाची फसवणूक करुण ७३ कोटी रूपयाचा अपहार केल्याचे स्पष्ट होते. या प्रकरणातील प्रामुख्याने दोषी आढळून आलेले सहाय्यक महसूल अधिकारी संजय हंगे आणि पांडुरंग पाटील तसेच कंत्राटी कर्मचारी त्रिंबक पिंगळे अविनाश चव्हाण शेख अजहर यांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तडकाफडकी निलंबित केल्याचे आदेश पारित केले आहेत. या घटनेने राज्याच्या महसूल क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

ज्याअर्थी, संबंधित कर्मचारी श्री. संजय नारायण होंगे, तत्का. सहायक महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय विभाग जिल्हाधिकारी कार्यालय बीड व सहायक महसूल अधिकारी, तहसील कार्यालय परळी वे, तसेच संबंधित कर्मचारी श्री. पांडूरंग तात्यासाहेब पाटील (हागर), सहायक महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, कंत्राटी कर्मचारी

यांचे विरुध्द शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ०५४४/२०२५ नुसार १. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३, लवाद व समेट अधिनियम १९९६ चे कलम १४,३४. भारतीय न्यायसंहिता (वी एन एस), २०२३ चे कलम ३१८ (४) ३१६ (५) ३३८, ३३६ (३).३४०(२), १९८,१९९,३१६ (२) ६१ व ३५१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन दि.१९.११.२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, श्री. संजय नारायण हांगे, सहायक महसूल अधिकारी तहसील कार्यालय परळी वै. नि. बीड यांना त्यांनी केलेल्या वरील गैरवर्तनाचे गांभीर्य विचारात घेवून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ४ (१) मधील तरतुदीनुसार शासन सेवेतून निलंबीत करण्यात येत आहे.तसेच त्यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपोल) नियम १९७९ ये नियम ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात येत आहे. आणखी असेही आदेशीत करण्यात येते की, लोकसेवक संजय नारायण हांगे, सहायक महसुल अधिकारी, तहसील कार्यालय परळी वै, जि. बीड यांचे निलंबन कालावधीत मुख्यालय तहसील कार्यालय, आष्टी - जि. बीड हे राहील व सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

लोकसेवक श्री. पांडूरंग तात्यासाहेब पाटील (हागर), सहायका महसूल अधिकारी, भूसंपादन समन्वय विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे निलंबन कालावधीत मुख्यालय तहसील कार्यालय, अंबाजोगाई - जि. बीड हे राहील व सक्षम अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

तसेच, महामार्ग कायदा १९५६ मधील तरतुदीचे अधिन राहुन भूसंपादनाची कामे विहित कालावधीत पार पाडण्यासाठी महामार्ग प्रकल्पाची भुसंपादन कामे होईपर्यंत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे सल्ल्याने श्री. त्रिंबक भानुदास पिंगळे (से.नि.) अव्वल कारकुन या कंत्राटी कर्मचारी म्हणून संदर्भक्र.०१ अन्वये नियुक्ती देण्यात आलेली होती. तसेच त्यानंतर वेळोवेळी सदर आदेशास मुदतवाढ देण्यात आलेली होती व संदर्भ २.०१ चे आदेशानुसार ते कार्यरत होते.श्री. त्रिंबक भानुदास पिंगळे (से.नि.) अव्वल कारकुन यांची सेवा, त्यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर फौजदारी गुन्ह्यांच्या अनुषंगाने, या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने समाप्त करण्यात येत आहे. यासोबतच श्री. अविनाश नानाभाऊ चव्हाण हे उपजिल्हाधिकारी भुसंपादन (समन्वय), बीड येथे कंत्राटी डेटा एंट्री ऑपरेटर या पदावर उपजिल्हाधिकारी भुसंपादन (समन्वय), यांचे पत्र दि. २८.०२.२०२५ अन्वये मागणी केल्यानुसार संदर्भीय आदेश क्र.०२ अन्वये कंत्राटी डेटा एंट्री ऑपरेटर या पदावर नियुक्ती देण्यात आली होती. सदर गुन्ह्यांचे स्वरूप अत्यंत गंभीर असून, ते शासकीय सेवेत असताना भ्रष्टाचार आणि इतर गैरव्यवहारांशी संबंधित आहेत. कंत्राटी कर्मचारी शासकीय कामकाजाचा भाग असल्याने, त्यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांमुळे शासकीय कामकाज व प्रशासकीय शिस्त राखण्याच्या दृष्टीने, जिल्हाधिकारी, बीड यांनी श्री. अविनाश नानाभाऊ चव्हाण, कंत्राटी डेटा एंट्री ऑपरेटर यांची सेवा, त्यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर फौजदारी गुन्ह्यांच्या अनुषंगाने, या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने समाप्त करण्यात येत आहे. त्यांना देण्यात आलेले शासकीय ओळखपत्र व अन्य साहित्य त्यांनी त्वरित संबंधित विभागाकडे जमा करावे असे आदेश दिले आहेत.

याच बरोबर श्री. अजहर शेख शेख बाबु, है उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प कार्यालय बीड येथे कंत्राटी संगणक ऑपरेटर या पदावर संदर्भीय आदेश क्र. ०१ अन्वये कंत्राटी संगणक ऑपरेटर या पदावर नियुक्ती देण्यात आली होती.श्री. अजहर शेख शेख बाबु, कंत्राटी संगणक ऑपरेटर यांची सेवा, त्यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या गंभीर फौजदारी गुन्ह्यांच्या अनुषंगाने, या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ प्रभावाने समाप्त करण्यात येत आहे. त्यांना देण्यात आलेले शासकीय ओळखपत्र व अन्य साहित्य त्यांनी त्वरित संबंधित विभागाकडे जमा करावे असे आदेश मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्या मान्यतेने ज्योती चौहान उपजिल्हाधिकारी, भूसंपादन जायकवाडी बीड यांनी आदेशित केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या चौघांना तडकाफडकी निलंबित करून मोठी कारवाई केली आहे महाराष्ट्राच्या महसूल विभागात या घटनेने मात्र मोठे खळबळ उडाली आहे.

### पालकमंत्री अजितदादा, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मालमत्ता तपासा ?

दादा, बीड जिल्ह्यातील राजकीय पुढारी आपसात भांडणामध्ये व्यस्त आहेत.त्यांचा प्रशासकीय कारभारावर वचक राहिलेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेत अधिकाऱ्यांचेच राज्य हातात आलेले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करण्याचे धाडस करत आहेत.त्यामुळे मागील दहा वर्षात जे जे अधिकारी कर्मचारी करोडपती झाले आहेत अशा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या स्थावर आणि जंगम मालमत्ता तपासा. अवाजवी संपत्ती कमवणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर दादा कारवाईचा नांगर फिरवा.

### भूसंपादन अधिकारी आणि संबंधित दोषी वकिलांवर काय कारवाई होणार ?

करोडो रुपयांचा जो भ्रष्टाचार महसूल विभाग अंतर्गत उघड झाला आहे. यामध्ये जे अप्रत्यक्ष सहभागी आहेत त्यात प्रामुख्याने ज्यांच्या स्वाक्षरीने हे पैसे बहाल करण्यात आले ते भूसंपादन अधिकारी आणि हा भ्रष्टाचार करण्यामध्ये जे वकील दोषी आहेत त्यांच्यावर पालकमंत्री अजित दादा आणि जिल्हाधिकारी साहेब आपण काय कारवाई करणार आहात ? दोषी वकिलांची सनद त्यांचे लायसन रद्द करणार का ? त्यांच्यावर गुन्हे दाखल करून अटक कधी करणार ?






---

## पूर्णा नदी पात्रातून किन्हीच्या साह्याने सर्रास अवैध वाळू उपसा; महसूल आणि पोलीस प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष?

### कारवाईचा केवळ देखावा, जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

तळणी /वार्ताहर

मंठा तालुक्यातील खोरवड, सासखेडा, आणि टाकळखोपा शिवारातील पूर्णा नदी पात्रातून किन्हीच्या साह्याने वाळूचा अवैध उपसा मोठ्या प्रमाणावर सुरू असून, याकडे महसूल आणि पोलीस प्रशासनाने सोयीस्कररीत्या दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. वाळू माफियांना प्रशासनाचा अभय मिळत असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.



कारवाईचा नुसता दिखावा

मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी कर्तव्यदक्ष तहसीलदार सोनाली जोंधळे यांनी अवैध वाळू उपशावर धडक कारवाया करून शासनाला जास्तीत जास्त महसूल मिळवून दिला होता. त्यांच्या धाकाने वाळू माफिया काही प्रमाणात वठणीवर आले होते. मात्र, त्यांच्या बदली झाल्यापासून परिस्थिती पुन्हा 'जैसे थे' झाली आहे. सध्याच्या काळात वाळू उपशावर होणारी कारवाई ही केवळ कागदोपत्री

(उर्वरीत पान ३ वर)

## परतूर नगर परिषद यांनी गाळाधारक शेख गफार यांची गाळा क्र १५२ विना नोटीस देता पाळल्याना

### मुख्याधिकारी नगरपरिषद यांच्यावर दंडात्मक कारवाई करा

परतूर /प्रतिनिधी

परतूर नगरपरिषदेच्या माध्यमांना काही महिन्यापूर्वी विना नोटीस देता गाळा क्र१५२ पाळण्यात आला होता या संदर्भात शेख गफार यांनी आयुक्त संभाजीनगर (औरंगाबाद )जालना जिल्हाधिकारी जालना जिल्हाध्यक्ष तसेच तहसीलदार उपविभागीय अधिकारी परतुर यांना निवेदन देण्यात आला आहे निवेदनात म्हटला आहे की



नगर परिषदेच्या मालकीचा गाळा क्र. १५२ विना नोटीस देता मुख्याधिकारी व नगर परिषदेचे कर्मचारी यांनी सुस्थितीत असलेला गाळा जो की, मला भाडेतत्वावर देण्यात आलेला होता तो जेसीबी सहाय्याने नष्ट करुन माझे व नगर परिषदेचे नुकसान केलेबाबत कायदेशीर कार्यवाही नगर परिषद, परतूर च्या मालकीचा मोंढा भागातील गाळा क्र. १५२ मी

रितसर अर्ज करुन भाडेतत्वावर नगर परिषदेकडे मागणी केली असता सदरील गाळा मला व्यवसाया करीता देण्यात आलेला आहे, सदरील गाळा हा स्वखर्चाने दुरुस्त करण्याच्या अटीवर देण्यात आलेला होता. सदरील गाळा हा मी स्वखर्चाने दुरुस्त केलेला आहे व त्याठिकाणी व्यवसाय सुरु केलेला आहे. त्यानुसार नगर परिषद यांनी दिनांक २४/०८/२०२१ रोजी जा.क्र. /न.प.प./१०५८/२०२१ नुसार देण्यात आलेला आहे. त्याआधारे मी नगर परिषद परतूर यांच्याकडून विद्युत मिटरसाठी परवानगी देखील

(उर्वरीत पान ३ वर)

## प्रभाग अकराचा चेहरा मोहरा बदलला आणखीन विकास करण्यासाठी संधी द्या - गीताभाभी पवार



गेवराई ।प्रतिनिधी

प्रभाग अकरा मधील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या, या भागातील तय्यब नगर, अचानक नगर, शिक्षक कॉलनी, वाणी मंगल कार्यालय परिसराचा चेहरा मोरा बदलला आहे. या भागाचा आणखीन विकास करण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद द्या असे आवाहन भाजपा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार गीता भाभी बाळराजे पवार यांनी केले गेवराई नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ११ मध्ये भाजपाच्या उमेदवार गीता भाभी पवार यांनी घरोघरी फिरून मतदाराच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी बोलताना गीता भाभी पवार म्हणाल्या की गेवराई शहराचे व पवार कुटुंबाचे ऋणानुबंध आहेत, या शहरातील प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे यासाठी पवार कुटुंब प्रयत्नशील असते. गेल्या वेळी

(उर्वरीत पान ३ वर)

## सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयात मानसिक आरोग्य शिबिर संपन्न

बीड ।प्रतिनिधी

सौ. के. एस. के. (काकू) अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मानसिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थ्यांना ताण-तणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी, भावनात्मक समतोल राखणे, तसेच निरोगी विद्यार्थी जीवनासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाचे समन्वयन श्री. अतुल बडवे यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्याचे महत्व, त्याचे दैनंदिन जीवनातील फायदे, आणि स्व-जागरूकता कशी वाढवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ झाला.हा उपक्रम राबविण्यासाठी श्री. अनंत कृषि विकास प्रतिष्ठान संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके सर त्यांच्या पाठिंब्यामुळे शिबिर अधिक प्रभावी, उपयुक्त आणि यशस्वीरीत्या पार पडले.या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# काँग्रेसची मनधरणी

निवडणुका जाहीर होईपर्यंत नकली डरकाळ्या फोडणाऱ्या उबाठाला प्रत्यक्ष मैदान दिसू लागताच कसा घाम फुटला आहे, हे गेल्या दोन-चार दिवसांतल्या त्यांच्या प्रयत्नांतून, त्यांच्या मुखपत्रांच्या माध्यमांतून दिसू लागलं आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपलं पुरतं वस्त्रहरण होणार हे ओळखून त्यांनी पूर्वीच मोठ्या प्रयासाने मनसेला मनवलं आणि आपल्याबरोबर घेतलं. मनसेसोबत येताच यांनी यांच्याच बाजूने दर दोन दिवसांनी एकीची ग्वाही द्यायला सुरुवात केली. 'आम्ही एकत्र आलो आहोत, ते एकत्र राहण्यासाठीच', हे पालुपद दोन-चार कार्यक्रमांत लावून त्यांनी उरल्यासुरल्या शिवसैनिकांना रोखण्याचे प्रयत्न केले. बेजान नेतृत्वामुळे हिंमत हरलेल्या शिवसैनिकांना शिवसेनेच्या उंबऱ्याआड रोखण्याचा तो प्रयत्नही फारसा यशस्वी झाला नाही. त्यामुळे, दिवाळीचं निमित्त साधून कौटुंबिक स्नेहसंमेलनाचे देखावे करण्यात आले. कोणतीही दुरावलेली कुटुंबं एक होत असतील, तर ती चांगलीच गोष्ट आहे. पण, तुमची कुटुंबं म्हणजेच तुमचे पक्ष नव्हेत. सैनिकांच्या कुटुंबांचा विचार कोणी करायचा? संपूर्ण पक्ष म्हणजेच कुटुंब असण्याचे वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाचे दिवस कधीच सरले. आता शिवसैनिकाला पोरकं करून, त्याला झिडकारून 'माझे कुटुंब हीच माझी जबाबदारी'चे दिवस सुरू झाल्याने उबाठाच्या ताकदीला इतकी उतरती कळा लागली आहे, की प्रत्येक निवडणुकीत त्यांचं अधिकाधिक वस्त्रहरण होत चाललं आहे. येत्या मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी, विरार, नवी मुंबई या महामुंबईतल्या महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक लढवतील असे उमेदवारही त्यांना मिळायला तयार नाहीत, अशी परिस्थिती झाल्यानंतर आता 'महाविकास आघाडी'चं कातडं पांघरून त्याआड लाज झाकण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. काँग्रेसने स्वतंत्र निवडणूक न लढवता 'आघाडी'त राहावं आणि 'आघाडी' म्हणूनच निवडणूक लढवावी, यासाठी विविध मार्गांनी वेगवेगळे युक्तिवाद केले जात आहेत.



बीड : पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नतीने निवड झाल्याबद्दल मुकुंद सूर्यभान तांदळे यांचा उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी आर्थिक गुन्हे शाखा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री भागीले, जिल्हा वाहतूक शाखा पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, डॉ. संजय तांदळे उपस्थित होते.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३७२ दि.२४.०९.२०२५

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री गणेश विलास थोरात रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानेश्वरी गणेश थोरात | मुलगी | २३.०४.२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## नगराध्यक्ष स्पर्धेतील बौध्द उमेदवारास बहुजन विकास मोर्चाचा जाहिर पाठिंबा

बीड ।प्रतिनिधी

बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांच्या मार्गदर्शना खाली व जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाने यांच्या नेतृत्वा खाली बहुजन मोर्चाची विकास बैठक पार पाडली. या बैठकीत नगरअध्यक्ष पदाचा उमेदवार हा दलीत चळवळीतील असा सर्व कार्यकत्यांचा सुर होता. त्यामुळे नगरपालीकेत सर्व वार्डात व नगराध्यक्ष पदाच्या चळवळीतील उमेदवाराला पाठींबा देण्याचा एकमताने ठरवण्यात आले.

यावेळी जिल्हाअध्यक्ष प्रशांत ससाणे यांच्यासह युवा जिल्हाअध्यक्ष जय तांगडे, शांतीदुत घोडके, सिध्दार्थ जोगदंड, सचिन ससाणे, अशोक हुंबरे यांच्यासह इतर पदाअधिकारी उपस्थीत होते.

## टीसी हरवला आहे

विद्या आश्रुबा काकडे रा. साबला या नावाचे १० वी पासचा टी सी व मार्क मेमो हा दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी केज ते बीड प्रवासा दरम्यान हरवलेला आहे.

तरी कोणास सापडल्यास खालील संपर्कावर संपर्क करावा.

**दत्तकुमार काकडे**
**मो.८३२९०९७४७४**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८६०/२०२५**
दिपक शिवदास पुरी विरुध्द निरंक
**(मार्फत-ॲड.एस.के.निकम)**

ज्याअर्थी मयत नामे **शिवदास शेषेबुवा पुरी हे दि.०६.०८.२०२५ रोजी अहिल्यानगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.दिपक शिवदास पुरी वय-३८ वर्षे, धंदा-नौकरी, रा.अहिल्यानगर, गेवराई ता.गेवराई जि.बीड, २.शंकुतला शिवदास पुरी वय-५९ वर्षे, धंदा-घरकाम, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **शिवदास शेषेबुवा पुरी** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -२१/११/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## जाहीर प्रकटन

बक्षीस पत्र मूळ गावठाण हद्दीतील सहन जागे बाबत कस्बे अंबड ता.अंबड जि.जालना र.पो.तु.अंबड जि.र.तु.जि.प.जालना विभाग क्र.१.३७ अंबड नगर परिषद हद्दीतील प्रति चौरस मीटर २३९०/- सहान जागा शासकीय बाजारभाव मूल्य किंमत रुपये १.८४,०००/- अक्षरी रुपये एक लाख चौऱ्यांशी हजार रुपये दिनांक ०३/०७/२०२४ ई.स.वी. लिहून घेणार-मुदस्सीर अब्दुल कय्युम वय ३८ वर्षे व्यवसाय व्यापार रा.अंबड ता.अंबड जि.जालना आधार कार्ड नं.-५९९२३४१०१०९८,लिहुन देणार -मुनवर शेख अब्दुल कय्युम वय ३६ वर्षे व्यवसाय व्यापार रा.अंबड ता.अंबड जि.जालना आधार कार्ड नं.-२५६४८४२३३९५२, कारणे बक्षीस पत्र लिहून देतो की लिहुन घेणार हा माझा नात्याने भाऊ असून कस्बे अंबड ता.अंबड येथील सिटी सर्व्हे नं.-१६४७ ज्याचे एकूण क्षेत्रफळ २८२.४० चौ.मीटर या मधील नगरपरिषद मिळकत नंबर १४-१३४ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १५३.८ चौ.मीटर यामधील माझे मालकी व ताब्यातील माझे नावे असलेली ७६.९० चौ. मीटर क्षेत्राची संपूर्ण सहान जागा लिहून घेणार माझ्या भावास आज रोजी कायमस्वरूपी बक्षीस दिली आहे. ज्याची चतु:सिमा. पूर्वेस-सुपरवायझर युनियन खोली जागा, पश्चिमेस- लिहून घेणार यांची याच सिटी सर्वे नंबर मधील जागा, दक्षिणेस-शेख महेमूद कासिम यांचे घर, उत्तरेस-तहसील कोर्ट रोड, यावरील चतु:सिमेच्या आतील सिटीसर्वे नंबर १६४७ मधील नगरपरिषद मिळकत नंबर १४-१३४ मधील ७६.९० चौ.मीटर मित्राची संपूर्ण सहन जागा लिहून घेणार माझ्या भावास आज रोजी बक्षीस दिले असून बक्षीस दिलेल्या सहन जागेचा स्विकार त्याने केला आहे. बक्षीस दिलेल्या सहन जागेचा मालकी व ताबा मी तुम्हास यापूर्वीच दिला आहे तुमचे मालकी व ताब्यास माझे इतर वारस, भाऊ, बिरादर यांनी वाघ अडथळा निर्माण केल्यास त्याचे निवारण मी लिहून देणार स्वतः करून देईन तसेच बक्षीस दिलेल्या सहन जागेवर सरकारी, सहकारी, खाजगी किंवा अन्य कोणत्याही बँकेचे कर्ज निघाल्यास त्या कर्जाचे निवारण मी लिहून देणार स्वतः करून देईन कर्जाचा बोजा लिहून घेणार यांना बक्षीस दिलेल्या सहन जागेवर येऊ देणार नाही आता माझा व माझे वारसांचा बक्षीस दिलेल्या सहन जागेवर काही एक हक्क संबंध अथवा मालकी राहिली नाही तसेच बक्षीस दिलेली सहन जागा मी तुमचे शिवाय यापूर्वी कोणासही गहाण तारण दान बक्षीस विक्री अथवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित केलेले नाही तसेच काही आढळून आल्यास त्याचे निवारण मी लिहून देणार स्वतः करून देईन तसेच आम्ही लिहून घेणार जाहीर करतोत की सदर दस्ताऐवजा मधील नमूद मालमत्तेचे सर्व प्रकारचे अभिलेख मालमत्ता हस्तांतराचे अधिनियम कलम ४१ व ५५ च्या तरतुतीप्रमाणे पडताळणी करून पाहिले असून ती आमच्या जबाबदारीवर खरेदी करीत आहे व हे लिहून घेणार व देणार दोघांनाही मान्य आहे महाराष्ट्र नोंदणी (सुधारणा) नियम २००५ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही केंद्र शासन व राज्य शासन यांच्या कायद्यान्वये या दस्तास प्रतिबंध केलेला नाही किंवा कोणत्याही सक्षम अधिकारी यांच्या परवानगीची या दस्तास आवश्यकता नाही या दस्तासोबत सादर केलेले सर्व पूरक कागदपत्रे लिहून घेणार व देणार यांनी आणलेली आहे त्यात काही बनावटीकरण आढळल्यास लिहून घेणार व देणार यांना नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ नुसार शिक्षक पात्र राहतील याची जाणीव आहे त्यास दुय्यम निबंधक अंबड किंवा दस्त लिहिणार टंकलेखक हे जबाबदार राहणार नाही या लेखाद्वारे तुम्ही बक्षीस दिलेला सहन जागेचे पूर्णपणे मालक व कब्जेदार झाले असून वंश परंपरागत उपभोग घेऊ शकता तसेच या लेखा आधारे तसेच या लेखा आधारे राजस्व कागदपत्री सिटी सर्वे कार्यालयात व नगरपरिषद कार्यालयात नामांतर करून घेऊ शकतात

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३५/२०२५**
गहिनीनाथ रामभाऊ करांडे वि.निरंक
**(मार्फत-ॲड.खोसे के.बी.)**

ज्याअर्थी मयत नामे **रामभाऊ बापुराव करांडे हे दि.२७.११.१९९९ रोजी कोळगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.गहिनीनाथ रामभाऊ करांडे वय-५५ वर्षे, धंदा-शेती, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, २.रूक्मीण त्रिंबक काशिद, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम, रा.साक्षळ पिंपरी ता.जि.बीड, ३.सुशाला वैजिनाथ करांडे, वय-५० वर्षे, धंदा-शेती व घरकाम, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, ४.अशोक वैजिनाथ करांडे वय-२८ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर, ५.नारायण वैजिनाथ करांडे वय-२५ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर** यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रामभाऊ बापुराव करांडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख -१९/१२/२०२५**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे का ढकलत नाहीत?

## न्यायालयाकडून राज्य सरकारला जाब

नवी दिल्ली/मुंबई : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षणाबाबतचा वाद निकाली लागेपर्यंत नामांकन प्रक्रिया पुढे ढकलण्याचा विचार का करत नाहीत, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारला केली. न्यायमूर्ती सूर्यकांत, उज्जल भुयान आणि एन. कोटिस्वर सिंग यांच्या खंडपीठाने यासंबंधी पुढील सुनावणी २५ नोव्हेंबरला ठेवली आहे. यामुळे ही सुनावणी होईपर्यंत राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या निवडणुकांच्या घोषणा होणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी राहुल रमेश वाघ आणि किसनराव गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर बुधवारी सुनावणी झाली. त्यावेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ओबीसी आरक्षणाशी संबंधित अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ मागितल्यानंतर 'आम्ही या मुद्द्यावर विचार करेपर्यंत तुम्ही नामांकन प्रक्रिया पुढे ढकलण्याचा विचार का करू शकत नाही?'



### प्रक्रिया स्थगित होण्याची शक्यता

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबरला जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २ डिसेंबरला २४६ नगर परिषदा व ४२ नगर पंचायतींसाठी मतदान होईल. मात्र, न्यायालयाने वारंवार दाखवलेल्या नाराजीमुळे नामांकन प्रक्रिया स्थगित होण्याची शक्यता वाढली आहे.

### प्रचार थंडावला, खर्चातही हात आखडता

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असल्याने निकाल येईपर्यंत 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेत रिंगणातील उमेदवारांचा प्रचार थंडावला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नगरपरिषद व नगरपालिकांमध्ये वाढलेल्या आरक्षणाचा विचार करून निवडणुकीला स्थगिती दिली तर काय? असा प्रश्न उमेदवारांना पडला आहे.. त्यामुळे अनेकांनी खर्चातही हात आखडता घेतला आहे.

### निवडणूक आयोगाला निर्णयाची प्रतीक्षा

मंगळवारच्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे राज्य निवडणूक आयोगाचे लक्ष लागले आहे. न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून आरक्षणात सुधारणा करण्याची तयारी आयोगाने ठेवली आहे. न्यायालयाची पुढील सुनावणी पार पडेपर्यंत निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार नाही. तसेच या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अजून नेमणूक झालेली नाही. याबाबत महसूल विभागाकडून अहवाल अप्राप्त आहे. नियुक्त झालेले निवडणूक निर्णय अधिकारी हजर झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर आयोगाकडून जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

### निवडणुकांत 'ईव्हीएम'चा उपयोग वैध आहे का?

नागपूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम'चा उपयोग करणे वैध आहे का? अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी राज्य निवडणूक आयोगाला करून यावर गुरुवारी (ता. २०) प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

# आदर्श शिक्षक नाथा ढगे यांनी जीवन शिक्षण विद्यालयास दिले पुस्तक भेट

किल्ले धारूर /अविनाश जगताप

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षक नाथा ढगे यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी पाच हजार शब्दार्थ व २८०० शब्द संपत्ती असलेले पुस्तक भेट देण्यात आले आहे.

सध्या स्पर्धा परीक्षेचे युग आहे या स्पर्धा परीक्षेसाठी मराठी व्याकरण ,शब्द संपत्ती मोठ्या प्रमाणावर आवश्यक असते ही मराठी शब्द संपत्ती शालेय वयापासूनच जर वाढली तर विद्यार्थ्यांना भावी आयुष्यामध्ये स्पर्धा परीक्षा देताना अडचणी येणार नाही

हा उद्देश समोर ठेवून प्रसन्न पब्लिकेशनचे मराठी शब्दार्थ अतिशय सुंदर पुस्तक आदर्श




शिक्षक नाथा ढगे यांनी जीवन शिक्षण विद्यालयास विद्यार्थ्यांसाठी दिले आहे. त्यांनी हे पुस्तक ग्रंथालयाच्या विभाग प्रमुख सौ मंगल वाटने मॅडम यांच्याकडे सुपूर्द केले आहे. त्यांच्या या उपक्रमाचे विद्यार्थ्यांनी स्वागत केले असून आम्ही हे पुस्तक संपूर्ण वाचणार असे विद्यार्थ्यांनी ठरवले आहे यावेळी विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार मुंडे उपमुख्याध्यापक अरुण समुद्रे सहशिक्षक हनुमंत काळे ,महादेव केदार इत्यादी उपस्थित होते.

# शहराच्या विकासासाठी सौ.शिफा बिलाल चाऊस यांची नगराध्यक्ष पदाची उमेदवारी- मोहन जगताप

माजलगाव (प्रतिनिधी) दि.१९ : माजलगाव शहराच्या विकासासाठी समृद्धीसाठी आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी सौ.शिफा बिलाल चाऊस यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली आहे. चाऊस यांच्या माध्यमातून आम्ही शहराचा विकास करणार असल्याचे मोहन जगताप म्हणाले.

तर विकास कामात टक्केवारी खाऊन भ्रष्टाचार करणाऱ्या आ. प्रकाश सोळंके यांना नगर परिषदेच्या निवडणुकीतून हद्दपार करणार असल्याचे बाबुराव पोटभरे यांनी सांगितले.

मोहन जगताप यांच्या पक्ष कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष नगरसेवक पदाचे उमेदवार बुधवार दि.१९ रोजी जाहीर करण्यात आले.

यावेळी ते पत्रकारांना बोलताना ती म्हणाली की, शहरात नागरी समस्या प्रलंबित आहेत. भ्रष्टाचाराने कळस गाठला आहे.अशा स्थितीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट निवडणुकीच्या मैदानात उतरला असून शहराच्या विकासाला आम्ही प्राधान्य देणार आहोत. असं सुतोवाचन पत्रकार परिषदेत पक्षाचे नेते मोहन जगताप यांनी केले.



दरम्यान नाट्यगृह, आठवडी बाजार, पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

तर बहुजन विकास मोर्चा मोहन जगताप सहाल चाऊस यांना सोबत घेऊन आ.प्रकाश सोळंके यांना नगरपरिषद निवडणुकीत हद्दपार करणार आहे. ही लढत टक्केवारी खाऊन गलेलठ्ठ होणाऱ्या आमदार सोळंकेला धडा शिकवणारी असेल

असे बहुजन नेते बाबुराव पोटभरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेला माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायण डक, कचरू खळगे,श्रीहरी मोरे, विश्वंभर थावरे, सहाल चाऊस, श्रीकृष्ण सोळंके, शकील कुरेशी, प्रभाकर नरवडे, विवेक पोटभरे, शरद यादव, इत्यादी उपस्थित होते. यावेळी प्रभाग क्रमांक १ मध्ये दळवी जया,शरद यादव प्रभाग २ जावळे उज्वला, तालेब चाऊस, प्रभाग ३ सय्यद आली नूर, शेख नाजमीन, प्रभाग ४ मेंडके किशोर, मेंडके कांताबाई, प्रभाग ५ सुचिता होके, चंद्रकांत देशमुख, प्रभाग ६ गंगाबाई भोसले, लतीफ सय्यद हुर, प्रभाग ७ शिंदे संध्या, शंकर शेंडगे, प्रभाग ८ सहाल चाऊस, शेख नूरजहाँ प्रभाग ९ महेमुद कुरेशी,

सीमा होके, प्रभाग १० नीला इतापे, इम्रान खान, प्रभाग ११ सुलताना कुरेशी, अजिंक्य डक, प्रभाग १२ लता वाघमारे, सय्यद तौफिक, प्रभाग १३ उषा अशोक लांडगे, सय्यद अफसाना सलीम यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# शांतिब्रह्म संत रामहरी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला सुरुवात

बीड ।प्रतिनिधी

वारकरी संप्रदायातील महान संत बंकट स्वामी महाराज यांच्या परंपरेतील शांतिब्रम्ह संत रामहरी महाराज यांच्या नवव्या पुण्यतिथी उत्सवाला मोठा थाटात सुरुवात झाली. श्री ह भ प गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प विष्णुपंत महाराज लोंढे गुरुजी, रणजीत महाराज शिंदे व विश्वस्त मंडळी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन, ग्रंथपूजन ,टाळ मृदंग पूजनाने सुरुवात झाली. सात दिवस या ठिकाणी अखंड हरिनाम, किर्तन प्रवचन संगीत भजन आदी कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.. या कार्यक्रमाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संत बंकट स्वामी भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



श्रीक्षेत्र वानगाव येथे अवतरणार भक्ती पंढरी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र वानगाव येथे संत बंकट स्वामी महाराज वारकरी परंपरेतील ओजस्वी तेजस्वी अष्टपैलू संत वै. शांतीब्रह्म रामहरी महाराज यांच्या नवव्या पुण्यतिथी उत्सवाला मोठ्या थाटात सुरुवात करण्यात आली.संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान वानगाव

गु.रामहरी बाबा सुसंस्कार आश्रम वानगाव फाटा ता. जि.बीड येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार यांचे कीर्तन होणार आहेत. पहिल्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प विष्णु महाराज जगताप, दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प शांती ब्रह्म महादेव महाराज चाकरवाडीकर, तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प गोरख महाराज कुदळकर, चौथा दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प ज्ञानेश्वर माऊली करंजीकर, पाचव्या दिवसाचे संभाजी महाराज नारायण गडकर, सहाव्या दिवसाचे कीर्तन पुष्प केशव महाराज चावरे, सातव्या दिवसाचे कीर्तन पुष्प रवींद्र महाराज हरणे, काल्याचे किर्तन श्री ह भ प महान लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



बीड - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी तर्फे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विष्णू भैया वाघमारे यांच्या सुविद्य पत्नी यांना नगराध्यक्ष होण्यासाठी बीड जिल्हा स्टेडियम वरील गुड मॉर्निंग ग्रुपने शुभेच्छा दिल्या.

# अर्जुन गायकवाड यांच्या रूपाने तुतारीच्या निनादाने धारूरचे वातावरण तापले!

किल्ले धारूर /प्रतिनिधी

किल्ले धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात अचानक उत्साहाची लाट उसळली आहे. मा. अर्जुन गायकवाड यांच्या जोरदार उपस्थितीने आणि त्यांच्या समर्थकांनी वाजवलेल्या तुतारीच्या गगनभेदी निनादाने संपूर्ण धारूरचे वातावरण अक्षरशः तापले आहे. तुतारीने उमेदवारीची जोरदार चाहूल अलीकडील काही दिवसांत अर्जुन गायकवाड यांचे जनसंपर्क दौरे, बैठका आणि ताकददार मोर्चेबांधणी यामुळे शहरात चर्चेची नवी भर पडली आहे. तुतारी वाजवत समर्थकांनी काढलेल्या रॅलीमुळे शहरभर एकच आवाज घुमू लागला आहे समर्थकांचा प्रचंड उत्साह तरुण कार्यकर्त्यांची मोठी फौज त्यांच्या सोबत दिसत आहे. तुतारीचे सूर,



ढोल-ताशांचा गजर, घोषणाबाजी आणि पथनाट्य अशा विविध माध्यमातून समर्थन व्यक्त केले जात आहे. धारूरच्या प्रमुख चौकात, बाजारपेठेत आणि गावातील टोळ्यांमध्येही आज एकाच गोष्टीची चर्चा सुरू आहे.

राजकीय वर्तुळात खळबळ या तुतारीनिनादामुळे इतर राजकीय गटही सावध झाले आहेत. कुणाची शक्ती कुठे वाढतेय, कुणाची पकड कमी होतेय, कोणता गट गायकवाड यांच्या बाजूने झुकतोय - याचा वेध मोठ्या नेत्यांनी घेण्यास सुरुवात केली आहे. आगामी दिवसांत अनेक घडामोडी घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अर्जुन गायकवाड यांनी विकासाच्या मुद्द्यांवर आणि शहराच्या प्रलंबित समस्यांवर केलेल्या चर्चेमुळे सामान्य नागरिकांमध्येही अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. जनतेचा प्रतिसाद पाहता गायकवाड यांच्या तुतारीने काहीतरी वेगळं चित्र तयार होणार, अशी चर्चा वेगाने पसरते आहे. एकंदरीत, अर्जुन गायकवाड यांच्या रूपाने तुतारीचा नाद इतका दणदणीत झाला आहे की धारूरचे वातावरण आता अक्षरशः निवडणुकीच्या भरात पेटले आहे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम विभागीय स्पर्धेसाठी आवरगाव ग्रामपंचायत ची तपासणी

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

संत गाडगे बाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेसाठी आवरगाव ग्रामपंचायतीची विभागीय पातळीवरील तपासणी मंगळवार, दिनांक १८ नोव्हेंबर रोजी पार पडली. या तपासणीत गावातील स्वच्छतेपासून ते सामाजिक सुविधांपर्यंत विविध घटकांची पाहणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान अधिकारी पथकाने गावातील स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, घरगुती व सार्वजनिक शौचालये, शालेय स्वच्छता, नाली व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षलागवड, धोबीघाट, गरम पाण्याची सुविधा,



पिठाची गिरणी अशा महत्त्वाच्या सुविधा आणि उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामपंचायतीने राबविलेल्या उपक्रमांचे तसेच नागरिकांच्या सहभागाचे अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त करत कौतुक केले.

या तपासणीसाठी पथकात सौ. सुषमा देसाई (उपयुक्त, विकास शाखा, छत्रपती संभाजीनगर), डॉ. ज्ञानोबा मोकाटे (अप्पर उपायुक्त, छत्रपती संभाजीनगर), संतोष चपलवार (विस्तार अधिकारी), वैजनाथ लोखंडे (गटविकास अधिकारी, धारूर), संतोष वाघमारे (एसबीएम जिल्हाप्रमुख), बाबळे साहेब (विस्तार अधिकारी) यांचा समावेश होता. सर्व अधिकाऱ्यांनी गावाच्या स्वच्छता व्यवस्थापनाबद्दल समाधान व्यक्त केले.यावेळी आदर्श सरपंच अमोल सर्जेराव जगताप, आदर्श ग्रामसेवक बाळासाहेब झोंबडे यांच्यासह गावातील सर्व नागरिक, महिला बचतगट व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वच्छतेबद्दल ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग हे गावाचे मोठे बलस्थान असल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.स्वच्छतेच्या क्षेत्रात विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविल्यामुळे आवरगाव ग्रामपंचायत विभागीय पातळीवर ठळकपणे पुढे आली असून, पुढील अंतिम फेरीतही गाव उत्कृष्ट कामगिरी करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धुळे-सोलापूर रस्त्यासाठी निधी मंजुरीत गैरव्यवहार

## जिल्हाधिकारी यांच्या बनावट स्वाक्षरीने २४१ कोटींच्या प्रकल्पाला मान्यता

महसूल सहायक, कंत्राटी कर्मचारी आणि वकीलांनी संगनमत करुनमागील तारखांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या खोट्यासह्या करुन बनावट आदेश तयार केले. ४८ दिवसांत संबंधितांनी २४१ कोटी ६२ लाखांचा वाढीवमावेजा मंजूर केला. तसेच त्यातील ७३ कोटी रुपयेशासनाकडून उपलब्ध करुन घेत त्याचे शेतकऱ्यांनावाटपही केले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसठाण्यात २ महसूल सहायक, ३ कंत्राटी कर्मचारी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचा १ कर्मचारी आणि ५वकील अशा १० जणांवर गुन्हा दाखल झाला.

बीड जिल्ह्यातून गेलेल्या धुळे-सोलापूर राष्ट्रीयमहामार्ग २११ च्या मावेजाबाबत अनियमितता असल्याची शंका जिल्हाधिकाऱ्यांना आली होती. त्यांनी गोपनीय चौकशीचे आदेश दिले होते. अपरजिल्हाधिकारी, तहसिलदार यांच्या समितीनेचौकशी केली. यामध्ये १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल२०२५ या ४८ दिवसांच्या काळात १५४ प्रकरणातजिल्हाधिकाऱ्यांचे बनावट आदेश तयार केल्याचेनिदर्शनास आले.

तिघांना अटक, सोमवारपर्यंत कोठडी



सूत्रधार संजय हांगे याच्यासह त्रिंबक पिंगळे आणि शेख या तिघांना अटक केलीआहे. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असतान्यायालयाने सोमवार पर्यंत पोलिस कोठडीसुनावली आहे. डीवायएसपी पूजा पवार या तपासकरत आहेत. तर संजय हांगे याला निलंबित केले.बनावट आदेशातून ७३ कोटींचा निधीउपलब्ध करून घेत शेतकऱ्यांना वाटला बनावट आदेश संबंधित विभागाला ५ महिने उशिरा मिळाल्याने

### ४० आदेशांची होती तयारी

चौकशी समितीने काही संचिकातपासल्या व काही संशयितांच्यामोबाईलमधील संभाषण आणिउपलब्ध व्हॉट्सअॅप चॅटिंगच्यामाहितीवरुन मागील कालावधीतीलतारखा टाकून आदेश करण्यातआल्याचे उल्लेख आहे. जुन्यातारखेच्या ४० लवाद आदेशआणखी होणार असल्याबाबतनोव्हेंबर महिन्याच्या संभाषणातउल्लेख आहे.

फुटले बिंग एकाच दिवशी संबंधितांनी ५० आदेश काढल्याने जिल्हाधिकाऱ्यांना आली शंका

विशेष म्हणजे पूर्वीचेजिल्हाधिकारी २२ एप्रिल रोजी बदलून गेले. त्यानंतर२४ एप्रिल रोजी नवे जिल्हाधिकारी रुजू झाले होते. त्यामुळे जुन्या जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट सह्याखपवण्यासाठी संबंधितांनी हा प्रकार केला. हे बनावटआदेश तयार केल्यानंतर संबंधित विभागाला हे आदेश५ महिने उशीरा मिळाले होते. त्यामुळे शंका आली.

### असा केला घोटाळा

भूसंपादनाचा पत्रव्यवहार हा भूसंपादन विभागाच्या समन्वय शाखेमार्फत होत असतो. मात्र हे बनावट आदेश तयार करतानाखोट्या सह्या, खोटे जावक क्रमांक टाकले. ते उघड होऊ नये म्हणून समन्वय शाखेत ते न देता थेट आवक विभागात दिले. संबंधित आदेश पारितकरताना कोणतेही रजिस्टर, कोणतीही कार्यविवरण नोंदवही बाबत माहिती भूसंपादन समन्वय कार्यालयाने ठेवलेली नाही. हा घोटाळा १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०१५ याकालावधीत झाला. यामध्ये १७ एप्रिल या एकाचदिवशी वाढीव मावेजा देण्याबाबतचे तब्बल ५० बनावटआदेश काढण्यात आले.

# गेवराई तालुक्यातील ७२ पैकी ६७ बंदुका जप्त

## पोलीसांची निवडणूकपूर्व मोहीम


गेवराई (प्रतिनिधी)

आगामी नगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील परवानाधारक शस्त्रांची तपासणी व जप्ती मोहीम वेगाने राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत गेवराई, चाकलांबा आणि तलवाडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत असलेल्या नागरिकांच्या एकूण ७२ परवानाधारक बंदुकांपैकी तब्बल ६७बंदुकींची जप्ती पूर्ण झाली असल्याची माहिती गेवराई पोलीस ठाण्याचे लेखनिक, नितीन शिंदे यांनी दिली.

पोलीस ठाणानिहाय आकडेवारी :

गेवराई पोलीस ठाणे: एकूण ४२ परवानाधारक बंदुका असून त्यापैकी ३९ बंदुका जमा करण्यात आल्या आहेत. उर्वरित ३ पैकी २ बंदुका महाराष्ट्र ग्रामीण बँकेत ठेवलेल्या आहेत, तर १ बंदुक टोल प्लाझावर असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

तलवाडा पोलीस ठाणे: येथे एकूण २२



बंदुका असून २० बंदुका जमा, तर २ बंदुका अद्याप जमा होणे बाकी आहे. चाकलांबा पोलीस ठाणे: येथील ८ ही बंदुका पूर्णपणे जमा झाल्याची माहिती देण्यात आली.निवडणूक काळातील सुरक्षेचा भाग प्रत्येक निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी परवानाधारक शस्त्रे तात्पुरती जमा करण्याची प्रक्रिया केली जाते. त्यानुसार यंदाही पोलीस प्रशासनाने ही मोहीम राबवली असून बहुतेक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंदुका जमा केल्याचे समजते.

# बीड जिल्ह्याचे राजकारण खालच्या थराला :- शेख युनूस

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे राजकारण हे दिवसेंदिवस खालच्या थराला जात आहे. याला कारणीभूत जनताच आहे. कारण कार्यकर्ते एकनिष्ठ आहेत पण, नेते मात्र स्वतःची पोळी भाजण्यासाठी कधी कोणत्या पक्षात जातील हे सांगणे खूपच कठीण झाले. आज या पक्षात तर उद्या त्या पक्षात जाणाऱ्या नेत्यांना जनतेने धडा शिकविला पाहिजे.



काही पक्ष राजकारणाचे अड्डे बनले आहेत. हे थांबवायचे असेल तर मतदार राजाला जागे होण्याची गरज आहे. त्यासाठी गुंडगिरी व काळे धंदे करणारे जर मत मागत असतील, तर त्यांना मत देऊ नका? हे लोक फक्त विकासाच्या गप्पा मारत असून जनतेने त्यांना विचारले पाहिजे , की सत्तेत असताना सुद्धा त्यांनी बीड जिल्ह्याचा विकास का केला नाही. अगोदर या प्रश्नाचे उत्तर विचारा आणि अशा नेत्यांना आपल्या हक्काचे मत देऊ नका. व दल बदलू नेत्यापासून जिल्ह्याला वाचवा. व योग्य उमेदवार निवडून द्या.

# माळेवाडी शिवारातील सिंदफणा नदीपात्रात एक ट्रॅक्टरवर कारवाई

शिरूर कासार - दिनांक १९/११/२०२५ रोजी १०.३० वाजता शिरुर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार १५३० तुषार गायकवाड पोलीस अंमलदार २२ ७९ सुनील बहिर वाल हे बीट मध्ये पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, माळेवाडी शिवारातील सिंदफणा नदीपात्रात एक ट्रॅक्टर वाळू घेऊन जात आहे.त्यानुसार घटनास्थळावर जाऊन छापा मारला असता तेथे एक हिरव्या रंगाचे जॉन डीअर ट्रॅक्टर त्याला ट्रॉली जोडलेली व त्यात वाळू भरलेली मिळून आली .चौकशीत सदर ट्रॅक्टर चालकाचे नाव हनुमंत रामभाऊ काशीद रा. फुलसांगवी, तालुका शिरूर असे असून, वाळू अनधिकृतपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले.या संदर्भात पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे गु.र.नं. ३२०/२०२५ कलम ३०३(२), बी.एन.एस. अन्वये ट्रॅक्टर चालक हनुमंत रामभाऊ काशीद रा. फुलसांगवी, तालुका शिरूर यांचे



विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ट्रॅक्टर किंमत ८,००,०००/- वाळू किंमत ८,०००/- एकूण मुद्देमाल किंमत ८,०८,०००/- ही कारवाई वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार पोलीस ठाणे चे सहा. पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोह/१५३० गायकवाड, पोशी २२७९ सुनील बहिरवाळ यांनी केली.सदर कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना प्रतिबंध लागून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर आळा बसण्यास मदत झाली आहे.

पान १ वरून...

**परतूर नगर परिषद यांनी....**

घेतलेली आहे त्यानुसार प्रति महिना २०००/- प्रमाणे न चुकता सप्टेंबर २०२१ व सप्टेंबर २०२२ पर्यंत२४,०००/- तसेच सप्टेंबर २०२२ ते मार्च २०२३ पर्यंत २४,०००/-, एप्रिल ५ २०२३ ते मार्च २०२४ पर्यंत २४,०००/- आणि एप्रिल २०२४ ते मार्च २०२५कार्यालय२०० पर्यंत २४,०००/- रुपये भाडे नगर परिषदेकडे दिलेले आहे. सदरील गाळयामध्ये मी माझा व्यवसाय करीत असतांना दिनांक १५/१०/२०२५ रोजी मला कोणतीही सुचना न देता अथवा नोटीस न देता सुस्थितीत असलेला गाळा जेसीबीच्या साहाय्याने मुख्याधिकारी व नगर परिषदेचे कर्मचारी यांनी सदरील गाळा पाडलेला आहे त्यामुळे माझे व नगर परिषदेचे नुकसान झालेले आहे.सदरील गाळा पाडण्याबाबत मुख्याधिकारी यांनी कोणताही ठराव न घेता नगर परिषदेला सदरील गाळा पाडण्याची आवश्यकता नसतांना हेतुपुरस्कर रित्या

सदरील गाळा पाडलेला आहे त्यामुळे माझे व नगर परिषद परतूरचे नुकसान झालेले आहे. त्याबाबत मी मा. मुख्याधिकारी नगर परिषद परतूर तसेच मा. महसुल सहाय्यक विभागीय आयुक्त कार्यालय संभाजीनगर येथे दिनांक १७/१०/२०२५ रोजी अर्ज दिलेले आहेत तरी देखील सदरील अर्जावर अद्याप पावेतो कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तरी संबंधितावर तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात येवून मला तात्काळ न्याय देण्यात यावा असे शेख गफार यांनी दिलेल्या निवेदनात म्हटला आहे

**पूर्णा नदी पात्रातून ...**

आणि देखाव्यापुरती मर्यादित असल्याचे चित्र आहे.

मंठा तालुक्यातील वाळू तस्करी हा केवळ बेकायदेशीर धंदा नाही, तर शासनाच्या महसूलाला चाप लावणारा मोठा भ्रष्टकारभार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज

पान १ वरून...

शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवून पर्यावरणाची हानी करणाऱ्या या अवैध धंद्याकडे जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. केवळ लहान-सहान कारवाया करून मोठ्या मगरमिठीकडे दुर्लक्ष केले जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून महसूल आणि पोलीस प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

या गंभीर प्रकारामुळे शासनाची प्रतिमा मलीन होत असून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुर्णा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा या संदर्भात तक्रारी आहेत सध्या निवडणूक असल्याने वाळू चोरांना संधी मिळाली आहे तहसीलदार यांना संदर्भात सुचना करण्यात येईल नागरीकांनी सुद्धा अवैध वाळू उपसा संदर्भात माहिती द्यावी

पद्माकर गायकवाड उपविभागिय अधिकारी परतूर

**प्रभाग अकराचा चेहरा ....**

या भागातील मतदारांनी आम्हाला संधी दिली, त्यामुळे आम्ही या भागाचा चेहरा मोहरा बदलू शकलो . अचानक नगर तय्यब नगर, शिक्षक कॉलनी, वाणी मंगल कार्यालयाचा परिसर या सर्व भागात सिमेंट रस्ते, डांबरीकरण रस्ते केले. घराघरात नळ कनेक्शन देऊन पाणीपुरवठा केला. या भागातील नागरिकांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी नव्याने पाईपलाईन टाकून पाण्याची टाकी याच भागात उभा केली. सर्व भागात विद्युत पुरवठा उपलब्ध करून दिला. नव्याने वसलेल्या वसाहती मध्येही आम्ही सुविधा उपलब्ध करून दिल्या. याशिवाय हक्काचा पी टी आर मेळावा यासाठी लक्ष्मण आण्णा यांनी सातत्याने प्रयत्न केले. आम्हाला संधी दिली त्यामुळे या भागातील नागरिकांची सेवा करू शकलो. या भागातील उर्वरित विकास करण्यासाठी आम्हाला संधी द्या असे आव्हान गीताभाभी पवार यांनी मतदार शी बोलताना केले. यावेळी भाजपाचे उमेदवार राहुल खंडागळे, ईस्माईल अत्तार,

# परतूरमध्ये पालिका निवडणुकीसाठी ३६ मतदान केंद्रे

परतूर /प्रतिनिधी

शहरात निवडणूक विभाग तसेच प्रशासनाची नगरपालिका निवडणुकीची





जोरदार तयारी सुरु असून शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण ३६ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी दिली.

दरम्यान, काही प्रभागांमध्ये दोन तर काही प्रभागात तीन मतदान केंद्रे असतील असेही श्रीमती तायडे यांनी सांगितले.

परतूर नगरपालिका निवडणुकीसाठी एकूण ३३ हजार ९६ मतदार आहेत. यामध्ये १६ हजार ४०९ पुरुष तर १६ हजार ६८७ महिला मतदार आहेत. येत्या २ डिसेंबर रोजी निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडणार असून दुसऱ्या दिवशी अर्थात ३ डिसेंबर रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे. दरम्यान, शहराच्या विविध प्रभागांमध्ये एकूण ३६ मतदान केंद्रे असणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी सांगितले.

# प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा दिला राजीनामा

बीड ।प्रतिनिधी

आज दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाचा मी प्राथमिक सदस्यत्वाचा आणि महासचिव पदाचा राजीनामा देत आहे. पक्षश्रेष्ठींकडे हा राजीनामा मी पाठवला आहे. माझा राजीनामा मंजूर करून मला पदमुक्त करावे अशी विनंती आपण माननीय अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना केली असल्याचे प्रा.सुशीलाताई मोराळे यांनी म्हटले आहे. पक्षात काम करताना होत असलेली कुचंबना व गळ चेपी तसेच लोकसभेला उमेदवारी नाकारली. विधानसभेलाही उमेदवारी



नाकारली. नगरपरिषद बीडच्या निवडणुकीत वार्ड क्रमांक ११ मधून राजेंद्र सानप यांच्या पत्नी मीराताई सानप यांना मी शिफारस करूनही उमेदवारी नाकारली. राजेंद्र सानप २६ वर्ष पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. मी जिल्हाध्यक्षांकडे मीराताई सानप यांना महिला ओबीसी प्रवर्गातून उमेदवारी द्या असा आग्रह मी केला परंतु त्यांची उमेदवारी नाकारली एकंदर पक्षात चालू असलेल्या मनमानी मुळे आणि माझी होत असलेली कुचंबना यामुळे मी पक्ष सोडत आहे. गेली ४० वर्ष समाजवादी राजकारणातली मी कार्यकर्ता आहे. जनता पार्टी, जनता दल परिवारात वाढलेली मी आहे. अशी कुचंबना मी सहन करू शकत नाही म्हणून मी राजीनामा दिला आहे असे प्रा. सुशीलाताई मोराळे

# धर्माबाद नगरपरिषद निवडणुकीचे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न

## निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी, धर्माबाद नगर परिषदेचे मुख्य अधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांच्या सुरेख नियोजनात प्रशिक्षण यशस्वी संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे मतदान दिनांक २.१२.२५ रोजी होणार आहे. त्या अनुषंगाने धर्माबाद नगरपरिषद निवडणुकीचे मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावरील केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दिनांक १९ ११ २०२५ रोजी दोन्ही सत्रात पहिले प्रशिक्षण पार पाडले सदरील प्रशिक्षणास उपस्थित असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा धर्माबाद तहसील कार्यालयाचे तहसीलदार श्रीमती सुरेखा स्वामी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी धर्माबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री कौस्तुभ गव्हाणे, तसेच शिवाजी जाकापुरे यांनी केले. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशिक्षणाधिकारी पी.आर.गावंडे, यांनी सुद्धा मार्गदर्शन केले.

यावेळी श्री त्रिचुरकर अजय प्राचार्य, श्री देशमुख पि. व्ही. कृषी अधिकारी पंचायत समिती, श्री संतोष जगणे उप अधिक्षक भुमी अभिलेख, एस.एम.निलमवार पंचायत समिती विस्तार अधिकारी , गटुरवार डि.एस. पंचायत समिती विस्तार अधिकारी , तसेच सदरील पहिले प्रशिक्षण केंद्राध्यक्ष ४७, मतदान अधिकारी, एक, दोन-तीन असे १९७ कर्मचारी उपस्थित होते. राखीव कर्मचारी, क्षेत्रीय अधिकारी, मास्टर ट्रेनर, यांची उपस्थिती होती अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आली. सदरील प्रशिक्षण नगरपरिषद सभागृह दिवाणी न्यायालय च्या पहिल्या मजल्यावर अग्निशामक केंद्र संपन्न झाले. सदरील प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सद्री परीक्षेसाठी धर्माबाद नगर परिषदेचे सर्व कर्मचारी तहसील कार्यातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षांच्या प्रभागात भाजपच्या रेवती घुंबार्डे व कविता लाड यांना मतदारांचा वाढता प्रतिसाद

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक ५ हा शहरातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या प्रभागांपैकी एक ठरला आहे. कारण या प्रभागातून राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांचा निवास असून, त्यांचे नातेवाईकदेखील याच भागात राजकीयदृष्ट्या प्रभावी मानले जातात. अशा संवेदनशील प्रभागात भाजपाच्या उमेदवारांना मिळणारा जोरदार प्रतिसाद राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

या प्रभागातून भाजपाच्या सौ. रेवती भगवानराव घुंबार्डे व सौ. कविता एकनाथ लाड या





नगरसेवक पदासाठी मैदानात असून त्या डोअर टू डोअर प्रचाराला वेग देत आहेत. प्रचारादरम्यान त्यांना स्थानिक नागरिकांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, प्रभागात वातावरण भाजपाच्या बाजूने फिरत असल्याचे जाणवते.

प्रभाग क्रमांक ५ हा राष्ट्रवादी उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांचा वार्ड असल्याने या प्रभागावर सर्वांचे लक्ष होते. विशेष म्हणजे सौ. रेवती घुंबार्डे या राष्ट्रवादीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांच्या मामी आहेत. दुसरीकडे, या भागात माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे आणि त्यांचे मामा, माजी नगरसेवक भगवानराव घुंबार्डे यांचीही ठोस पकड असल्याने मामा-भाचा राजकारण हा वॉर्डमधील प्रमुख विषय ठरला आहे.

या साऱ्या राजकीय पार्श्वभूमीच्या दरम्यान भाजपाच्या दोन्ही उमेदवारांनी प्रभागात घराघरात जाऊन जनसंपर्क वाढवला आहे. नागरिकांशी थेट संवाद साधून स्थानिक प्रश्न, सोयी-सुविधा आणि आगामी विकासकामांबाबत त्यांनी मांडलेली भूमिका मतदारांना पटत असल्याचे चित्र दिसून येते. सध्या तरी प्रभाग क्रमांक ५ मध्ये सौ. रेवती घुंबार्डे व सौ. कविता लाड यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने राष्ट्रवादीच्या गोठात खळबळ उडाली आहे.

# जयक्रांती महाविद्यालयास प्र.कुलगुरु डॉ.अशोक महाजन यांची भेट

## प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमाचे केले कौतुक

लातूर ।प्रतिनिधी

येथील जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयात सुरू असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या हिवाळी परीक्षा केंद्रास प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी सदिच्छा भेट देऊन समाधान व्यक्त केले व अनेक नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुकही केले.यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, संस्थेचे सचिव प्रा. गोविंदराव घार, डॉ. राजेश्वर खाकरे, डॉ. राजेश करंजकर, डॉ. दिलीप गुंजरगे, डॉ. हरिश्चंद्र चौधरी,डॉ. रामेश्वर स्वामी, डॉ. केशव आलगुले, डॉ. प्रमोद चव्हाण,डॉ. शरण निलंगेकर, डॉ. धीरज कोतमे, डॉ. गीता वाघमारे, यांची प्रमुख उपस्थिती होती.जयक्रांती महाविद्यालयातील विविध उपक्रमावर योजनांची माहिती प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांना दिली. यामध्ये माता पिता आधार



योजना, ग्रंथालय समृद्धी योजना, रस्ता सुरक्षा अभियान, जागर जानिवांचा अभियान, पूरग्रस्तांना मदत, गरीब विद्यार्थ्यांना दत्तक योजना, मेंटोरमेंटी, करियर कट्टा, क्रीडा विभाग सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग या सर्व विभागांतर्गत महाविद्यालयात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी दिली या उपक्रमाचे प्र. कुलगुरू महोदयांनी कौतुक केले . व परीक्षा केंद्रास भेट देऊन पाहणी केली परीक्षा सुरळीत सुरू असल्याचे समाधान ही व्यक्त केले. सर्वांशी संवाद साधला.



# खेड्यातील शेतकऱ्याची मुलगी बनली डॉक्टर : निकिताच्या यशामागे जिद्दीची कहाणी

डॉ आशिष तिवारी/मंठा

मंठा तालुक्यातील अतिदुर्गम अंभोरा जहागीर येथील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील निकिता गजानन बाहेकर हिने वैद्यकीय क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. वैद्यकीय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत तिला कोपरगाव (जि. अहिल्यानगर) येथील सखुबाई कातकडे वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस प्रवेश मिळाला.

प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा अंभोरा जहांगीर येथे तर पुढील शिक्षण वैद्य-वडगावमध्ये घेतले. आर्थिक अडचणी, शैक्षणिक सुविधा नसतानाही चिकाटीच्या जोरावर तिने हे यश मिळवले.निकीता बाहेकरच्या उपलब्धीने अंभोरा परिसरात आनंदाचे वातावरण पसरले असून ग्रामस्थांच्या वतीने व किसनराव मोरे तथा मोरे परिवारा तर्फे निकिताचा सत्कार करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती किसनराव मोरे, सरपंच संतोषराव पारखे, शिवाजीराव मोरे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

# सेवानिवृत शिक्षकांनी बैठकीस उपस्थित राहवे - अनिल जाधवर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अंशराशीकरण व उपदान हे आर्थिक लाभ सेवानिवृत्त शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळणे शासना निर्णया प्रमाणे तसेच नियमाप्रमाणे देय आहेत. परंतु बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे देय असलेले आर्थिक लाभ एप्रिल २०२४ पासून प्रलंबित आहेत हक्काच्या आर्थिक लाभापासून सेवानिवृत्त शिक्षकांना बीड जिल्हा परिषदेने व शासनाने वंचित ठेवले आहे.

एप्रिल २०२४ पासून ऑक्टोबर २०२५ च्या कालावधी दरम्यान सेवानिवृत्त झालेल्या जिल्हा परिषदेतील शिक्षकांपैकी २८४ शिक्षकांचे सेवाविषयक सेवानिवृत्ती लाभ मिळालेले नाहीत .त्यामुळे सेवानिवृत्त शिक्षक अडचणीत आलेले असून पाल्यांचे उच्च शिक्षण, घरबांधणी



कर्ज,विविध गंभीर आजार इत्यादी कारणाने जेरीस आलेले आहेत .यापूर्वी कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या वतीने वित्ततरतूद करणेबाबत माननीय शिक्षण संचालक प्राथमिक, शिक्षण आयुक्त पुणे, वित्तसचिव, शिक्षण सचिव, शिक्षण मंत्री, वित्त मंत्री यांना निवेदन दिलेले आहे . परंतू नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही या उक्तीप्रमाणे आता कार्यवाही करण्याची गरज निर्माण झाल्यामुळे पुढील रणनीती व नियोजन ठरवण्यासाठी शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी दुपारी ठीक दोन वाजता बीड येथे सेवानिवृत्त शिक्षकांची बैठक जिल्हा परिषद शाळा पोलीस कॉलनी, पोलीस मुख्यालय, धानोरा रोड बीड येथे आयोजित केलेलीआहे . सदरील बैठकीमध्ये ठोस निर्णय घेऊन पुढील दिशा ठरवली जाणार आहे . याकरिता सर्व सेवानिवृत्त शिक्षक जे आर्थिक लाभांपासून वंचित आहेत त्यांनी उपस्थित रहावे

# ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयात ह.भ.प. संतोष महाराज तौर यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न

बीड । प्रतिनिधी

ग्रंथ हे जीवनासाठीचे उत्तम मार्गदर्शक असतातच, वाचेल तो वाचेल, हे सत्य आहेच, वाचन चळवळीचे स्वरूप बदलते आहे.. तेही स्वीकारले जाते. वाचनासोबतच ग्रंथाचा अभ्यास, चर्चा, चिंतन हा उपक्रम आपण हाती घेतलेला आहे. त्याअनुषंगानेच दर बुधवारी असणाऱ्या ए.एच. वाडिया सार्वजनिक वाचनालयाच्या ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गात बुधवार दि. १९-११-२०२५ रोजी सायं ५.३० ते ६.३० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात ह.भ.प. संतोष महाराज तौर यांचे ज्ञानेश्वरीवर चिंतन संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पुजन प्रमुख व्याख्याते ह.भ.प. संतोष महाराज तौर, डॉ. अनुराग पांगरीकर, श्री. मधुकरराव वैद्य, ॲड. आनंद पाटील, सौ. सुचिता औटी, डॉ. आश्विनी करपे, सौ. निलीमाताई पाटांगणकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यानंतर प्रमुख वक्ते ह.भ.प. संतोष महाराज तौर यांचे स्वागत डॉ. अनुराग पांगरीकर यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

यानंतर प्रमुख व्याख्याते ह.भ.प. संतोष महाराज तौर यांनी ज्ञानेश्वरी व्याख्यानमाला या मालेत २३ वे पुष्प




गुंफतांना श्रोत्यांना ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायावर विस्तृतपणे निरपण केले. जवळपास एक तासाच्या आपल्या चिंतनात त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमास सरचिटणीस ॲड. गोविंद कासट, डॉ.जी.एम. कुलकर्णी, डॉ. पी.के. कुलकर्णी, डॉ. जाधव वशिष्ट, श्रीकिसन जेथलिया, मोहन निराळे, संजय चौसाळकर, प्रा.आर.टी.गर्जे, दाणी निलेश, चैतन्य प्रकाश, श्रीकांत क्षीरसागर, डॉ. राम देशपांडे, सौ. रेणूका देशमुख, सौ. स्नेहलता देशमुख, सौ. स्वाती जाधव, सुषमा श्रीकांत रुईकर, डॉ. मंगेश वालेवाडीकर, श्रीराम देशमुख, यांच्यासह वाचक, सभासद, कर्मचारी वृंद आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.सदरील कार्यक्रम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री. अमोलकचंदजी सुराणा, उपाध्यक्षा डॉ. रोहिणीताई वैद्य, सदस्य ॲड. कालीदासनाना थिगळे, डॉ. हेमलता पाटील, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनुराग पांगरीकर, सरचिटणीस ॲड. गोविंद कासट यांच्यासह कार्यकारी मंडळातील पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रम यशस्वतेसाठी ग्रंथपाल ग्रंथमित्र गणेश शेंडगे, किशोर ठोसर, कुमार देशमुख, संतोष जगताप, रमेश जोशी, रामेश्वर जाधव यांनी परिश्रम घेतले.

# नैसर्गिक आपत्ती आणि रब्बी हंगाम पेरणीसाठी अनुदान वाटपास सुरुवात

## शेतीपिक नुकसान झालेल्या ६,८५,५४९ इतक्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये ४४०.५१ कोटी रुपये तर रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी ६,४६,३१६ इतक्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५०७.९८ कोटी इतकी रक्कम थेट वर्ग

**बीड ।प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये माहे जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने शेती पिकाचे नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरू आहे. त्यासाठी ७०२.०४ कोटी व रब्बी हंगामामध्ये पेरणीसाठी एकूण ७०८.०८ कोटी असे जिल्ह्यास एकूण १४१०.१२ कोटी अनुदान मंजूर झाले आहे.**

सदरचे अनुदान वाटप करण्यासाठी जिल्ह्यातील १४८०६३९ इतक्या शेतकऱ्यांची माहिती पंचनामा पेमेंट पोर्टलवर भरण्यात आलेले असून त्यापैकी शेतीपिक नुकसान झालेल्या ६८५५४९ इतक्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये ४४०.५१ कोटी रुपये थेट वर्ग करण्यात आले असून रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी ६४६३१६ इतक्या शेतकऱ्यांच्या थेट बैंक खात्यात ५०७.९८ कोटी इतकी रक्कम वर्ग केलेली आहे. अशी एकूण जिल्ह्यातील १३३१८६५ इतक्या शेतकरी यांना एकूण ९८४.४९ कोटी इतकी रक्कम त्यांच्या बँक खात्यात थेट वर्ग करण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित शेतकऱ्यांना तातडीने अनुदान वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील एकूण १०४३३१ इतक्या शेतकरी यांची ई-केवायसी प्रलंबित असून अशा शेतकऱ्यांनी तात्काळ आपले जवळचे उडउ / सेतू सुविधा केंद्रात जावून आपली विशिष्ट क्रमांकाची ई-केवायसी करून घ्यावी.ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक (-सीळडींरलझ) योजनेअंतर्गत नोंदणी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी तात्काळ आपले जवळचे उडउ केंद्र किंवा आपले ग्राम महसूल अधिकारी यांचेशी संपर्क साधून आपली ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत नोंदणी तात्काळ पूर्ण करून घ्यावी जेणे करुन आपले नैसर्गिक आपत्ती अंतर्गत अनुदान तात्काळ मिळणेस मदत होईल, असे आवाहन जिल्हा प्रशासना तर्फे करण्यात येत आहे.

# अंकुशराव टोपे महाविद्यालयाचा विभागावर दणदणीत विजय; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी भक्कम दावेदारी

फारुक शेख :- क्रीडा युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तथा विभागीय क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी कॉलेज मैदानावर १८ व १९ नोव्हेंबर रोजी पार पडलेल्या १९ वर्षांखालील शालेय विभागीय स्तरीय क्रिकेट स्पर्धेत अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना संघाने विजयी चेंडू फेकत विभागावर आपली छाप उमटवली आहे.

अंतिम सामन्यातील तुफानी भिडतीत टोपे महाविद्यालयाने देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगरचा १५ धावांनी पराभव करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी थेट तिकीट मिळवले. सामन्यातील प्रत्येक ओव्हरमध्ये खेळाडूंच्या दमदार कामगिरीची खणखणीत छाप दिसून आली.या बहुमोल विजयानंतर खेळाडूंचा भव्य सत्कार माजी आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. राजेशभैय्या टोपे व सचिव सौ. मनिषाताई टोपे यांच्या शुभहस्ते



करण्यात आला.यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी. आर.गायकवाड,सह प्रशासकीय अधिकारी प्राचार्य राहुल भालेकर,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील,प्रा. पांडुरंग खोजे,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भुजंग डावकर,प्रा. चंद्रकांत लाटेकर,पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर,अधीक्षक सुरेश चव्हाण,डॉ.शंकर तिकांडे, ॲड.बालासाहेब भुतेकर,कोच जफर शेख,प्रा.राज पवार व सीताराम वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.सर्वांनी विजयी शिलेदारांचे जोरदार अभिनंदन करून त्यांचा उत्साह द्विगुणित केला.विजयी संघात कर्णधार ओमकार वाघ,उपकर्णधार राफे सौदागर,हर्षराज राठी,वेदांत देशपांडे,ज्ञानेश्वर राठोड, ओमकार वाघमारे,शेख फरहान, पवन लिखे,अभय चंदेल,अर्शद खान,राज ठाकूर,सय्यद अवेज, झहीर खान यांसारखे बहुगुणी खेळाडू चमकले.उदयोन्मुख क्रिकेटपटूंना आता २४ व २५ नोव्हेंबर रोजी नाशिक क्रीडा संकुलात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत आपली क्षमता सिद्ध करण्याची सुवर्णसंधी आहे. जालना जिल्ह्यातून या तरुण वाघांकडून भक्कम कामगिरीची अपेक्षा व्यक्त होत असून सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# धर्मपीठाचा आशिर्वाद परांडकर ब्रम्हमठ युसुफ वडगाव येथे राचलिंग शिवाचार्य महाराजांचा काँग्रेस जिल्हाध्यक्ष

## राहुल भैय्या सोनवणे यांनी घेतला आशीर्वाद !



केज/ प्रतिनिधी

राजकीय आणि सामाजिक कार्यात सक्रिय असलेले काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष युसूफ वडगाव जिल्हा परिषद सर्कलचे उमेदवार तथा गंगा माऊली शुगरचे संचालक श्री.राहुल भैय्या सोनवणे यांनी गुरुवारी युसूफ वडगाव येथील परांडकर ब्रम्हमठ येथे राचलिंग शिवाचार्य महाराजांची भेट घेऊन त्यांचे दर्शन घेतले व त्यांचे आशीर्वाद घेतले.

धर्मपीठाचा आशीर्वाद हा धार्मिक कार्याबद्दल आदर व्यक्त करत राहुल भैय्या सोनवणे यांनी मठावर येऊन राचलिंग शिवाचार्य महाराजांचे चरणस्पर्श करून आशीर्वाद घेतला. आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर त्यांनी महाराजांकडून सदिच्छा व शुभेच्छा घेतल्या.यावेळी राचलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कडून सत्कार व शुभेच्छा घेऊन आशिर्वाद घेतले.

यावेळी राचलिंगशिवाचार्य महाराजांनी देखील राहुल भैय्या सोनवणे यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त केले.महाराजांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन राहुल भैय्या सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला आणि त्यांच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या.धर्मपीठाच्या या आशीर्वादामुळे राहुल भैय्या सोनवणे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

या महत्त्वाच्या भेटीप्रसंगी राहुल भैय्या सोनवणे यांच्यासोबत शिवदास तात्या पाटील,बाळासाहेब नांदे,सुहास गुजर, नागनाथ राऊत,कोरसाळे आप्पा आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुक्रमाबाद जिल्हा परिषद पं. स. गोजेगाव गणातून

## रमेश पाटील गोजेगावकर इच्छुक उमेदवार

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुक्रमाबाद गणातून जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळे लवकरच सुरू होणार असून सर्वसाधारण पद मिळवण्यासाठी सर्वच पक्षाचे उमेदवार नेते मंडळी ज्याच्या त्यांच्या परीने कामाला लागली आहे. यात इच्छुक उमेदवार श्री रमेश पाटील यांच्या नावाला जनतेतून पसंती मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

महाराष्ट्रात नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीच्या पाठोपाठ जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका होणार असल्याची शक्यता वर्तुण्यात येत आहे.

गोजेगाव हा पंचायत समिती गण सर्वसाधारण जातीसाठी आरक्षित असल्याने संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून आहे. मुक्रमाबाद गणातून जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक होणार आहे. त्यासाठी परीसरात ४० वर्षापुर्वी शिक्षणाची ज्योत पेटविणारे कै.गंगाधर रामचंद्र पाटील गोजेगावकर यांचे पुत्र संत श्री तुकाराम महाराज सेवाभावी संस्थेचे सचिव मा. श्री रमेश गंगाधरराव पाटील गोजेगावकर हे मुक्रमाबाद जिल्हा परिषद गोजेगाव पंचायत समिती निवडणूकीसाठी इच्छुक उमेदवार असून जनतेतून त्यांना वाढता पाठिंबा व पसंती मिळत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.ते प्रामाणिक, सामाजिक, राजकीय शैक्षणिक कार्यात अग्रेसर



असणारे रमेश गंगाधराव पाटील सध्या गोजेगाव गणात चर्चेचा विषय ठरत आहेत.



## मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणारे पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव

परतूर /प्रतिनिधी

मागील महिन्यात परतुर शहरात व जिल्हयात मोटारसायकल चोरी करणा-या आरोपीतांना पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी व अंमलदार यांनी अटक करून त्यांचेकडुन्न महागडया मोटारसायकली जप्त करण्यात आलेल्या होत्या. सदर आरोपीकडुन विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन चोरुन नेलेल्या मोटारसायकलीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

सदर प्रकरणाची दखल घेऊन्न मा.पोलीस अधीक्षक श्री.अजय कुमार बंसल साहेब यांनी दिनकर २०/११/२०२५ रोजी जालना येथे आयोजित गुन्हे परिषद बैठकी दरम्यान उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत या शिर्षाखाली पोलीस ठाणे परतुर येथील पोलीस निरीक्षक श्री.एस.बी.भागवत, श्री.अमोल रावते, पोउपनि, पोलीस अंमलदार अशोक गाढवे, किरण मोरे, गजानन राठोड, अमोल गायकवाड, राम हाडे, विजय जाधव, नरेंद्र चव्हाण, पवनकुमार धापसे, नितीन बोंडरे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आलेले आहे.



# कळंब तालुक्यातील शिराढोण येथील

## ७४ लाभार्थ्यांना दिलासा

कळंब ।प्रतिनिधी

कळंब तालुक्यातील तसेच शिराढोण गावातील ७४ पात्र लाभार्थ्यांना प्रत्येकी १२,००० प्रमाणे एकूण ८,८८,००० इतकी रक्कम तीन टप्प्यांत वितरीत होणार आहे. पहिला टप्पा दिनांक २१ रोजी खात्यात जमा होणार आहे. या अनुदानासाठी दिनांक ३ नोव्हेंबर रोजी निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. त्याला आज यश मिळून गावाला मोठा दिलासा मिळाला आहे.घटक अधिकारी एस. ए. अकेले, विस्तार अधिकारी झांबरे साहेब, साळुंखे साहेब यांनी ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन लाभार्थ्यांची लाभपत्रे सुपूर्द केली.

दरम्यान अत्यंत महत्त्वाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत ७२ लाभार्थी तसेच रमाई आवास योजनेतील पात्र लाभार्थी यांना लवकरात लवकर योजना लाभ मिळावा यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याबद्दल माननीय गट विकास अधिकारी साहेबांचा शेतकरी सुमंत पापा नाईकवाडी यांनी सत्कार करून आभार मानले.यावेळी सरपंच लक्ष्मीताई म्हेत्रे उपसरपंच अमोल माकोडे माजी सरपंच पद्माकर पाटील ग्रामपंचायत सदस्य बीबी नंदा गोरे लेक लाडकी योजनेचे अध्यक्ष नितीन पाटील सुमत नाईकवाडे पत्रकार अमोल चंदेल सुरेश महाजन ज्योतीताई महाजन जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक आहीरे सर उर्दू मुख्याध्यापक डांगे सर पशुवर्धन अधिकारी वैद्यकीय अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वाळू तस्करांची दहशत संपुष्टात!; पोलिसांनी काय केले पहा

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

राहुरी तालुक्यात सामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरवून बेकायदेशीर वाळू तस्करी करणारे तसेच महिला अत्याचारासारखे गंभीर गुन्हे दाखल असलेली टोळी अखेर हद्दपार करण्यात आली आहे. टोळीप्रमुख दीपक बबन लाटे याच्यासह ५ जणांच्या टोळीला अहिल्यानगर जिल्ह्याच्या हद्दीतून १ वर्षाकरिता हद्दपार करण्याचे आदेश जिल्हा हद्दपार प्राधिकरणाने दिले आहेत. या कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी वृत्तीवर व दहशतीवर नियंत्रण मिळण्यास मदत होणार आहे.

राहुरी तालुयातील चिंचोली येथील दीपक बबन लाटे (वय ३६) याने त्याचे सदस्य निखील बबन लाटे (वय ३४, रा. चिंचोली), शहादेव विठ्ठल माने (वय ३४, रा. लेंडी तलाव, बुलढाणा), अभिषेक राजेंद्र नाचणे (वय ३२, रा. बेलापूर, ता. राहुरी), शंकर राजेंद्र भोसले (वय २८, रा. पिंपळगाव फुणगी) व इतरांसह एक गुन्हेगारी टोळी तयार केली होती. या टोळीने आपले गुन्हेगारी अस्तित्व टिकवण्यासाठी सातत्याने गुंडगिरी केली. महिला अत्याचाराचे गुन्हे, मारहाण व दहशत, बेकायदा कृत्य व इतर गुन्हे टोळीवर दाखल आहेत. टोळीप्रमुख आणि सदस्यांविरुद्ध सन २०१७ पासून गुन्हे दाखल आहेत, तसेच राहुरी पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्यावर टोळीच्या सततच्या गुंडगिरीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते आणि नागरिक उघडपणे तक्रार करण्यास किंवा साक्ष देण्यासाठी पुढे येत नव्हते. भविष्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे होण्याची शयता असल्याने, राहुरी पोलीस स्टेशनचे निरीक्षक संजय ठेंगे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ५५ नुसार टोळीला हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक तथा हद्दपार प्राधिकरणाकडे सादर केला होता. उप विभागीय पोलीस अधिकारी, श्रीरामपूर विभाग, जयदत्त भवर यांनी या प्रस्तावाची चौकशी करून शिफारस केली.सखोल चौकशीअंती टोळीप्रमुख दीपक बबन लाटे आणि सदस्य निखील बबन लाटे, शहादेव विठ्ठल माने, अभिषेक राजेंद्र नाचणे यांना अहिल्यानगर जिल्ह्यातुन १ वर्षाकरिता हद्दपार करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत

## जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्यांनाच संधी – जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे

### शिवसेना (शिंदे गट) इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींना उत्स्फूर्त प्रतिसाद




मंठा : ग्रामीण भागातील प्रश्नांची जाण असणाऱ्या आणि जनतेच्या हितासाठी काम करणाऱ्या उमेदवारालाच संधी दिली जाईल, असे शिवसेना जिल्हाप्रमुख व सभापती ए. जे. बोराडे यांनी सांगितले.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मंठा तालुका व नेर-सेवली मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या उपस्थितीत घेण्यात आल्या.

कार्यकर्त्यांनी निवडणुकांसाठी सज्ज राहावे व अधिकृत उमेदवारांची यादी लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या मुलाखतींना इच्छुक उमेदवारांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. यावेळी माजी सभापती प्रल्हादराव बोराडे, माजी उपसभापती किसनराव मोरे, संचालक संतोष वरकड, महादेव बाहेकर, केशव महाराज सरकटे, परमेश्वर उबाळे, बाबाराव राठोड आदिंची उपस्थिती होती.

# तुतारीकडून प्रचाराचा शुभारंभ

## मतदारांचा उत्साह बीडच्या विकासाला नवी दिशा देणार– आ.संदीप क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

बीड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून शुभारंभ करण्यात आला. शहरातील प्रभाग क्रमांक २ आणि प्रभाग क्रमांक १८ मध्ये कॉर्नर बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी,मतदारांमध्ये दिसणारा उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले. तसेच नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असलेल्या सौ.स्मितताई विष्णू वाघमारे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि मित्रपक्ष शिवसेना





उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व उमेदवारांना मतदानरूपी आशीर्वाद देऊन विजयी करा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत, लोकांसाठी प्रामाणिक काम करणारे उमदेवार निवडून दिले आहेत. या उमेदवारांना मतदार निश्चितच स्वीकारणार आहेत. मतदार बांधवांमध्ये दिसणारा उत्साह हा बीडच्या विकासाला नवी दिशा देणारा आहे. असे आ.क्षीरसागर यांनी सांगितले. गुरुवार (दि.२) रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचाराला सुरुवात झाली. प्रभाग क्रमांक २ मध्ये नगरसेवक पदाच्या उमेदवार असलेल्या सौ.स्वाती सचिन दुधाळ आणि श्री.विष्णू शामराव वाघमारे तसेच प्रभाग क्रमांक १८ मधून उमेदवार असलेले शेख अब्दुल मुखीद अब्दुल रज्जाक (मुखीद लाला) आणि शेख फरहीन अर्शान (शेख रोहिल रफिक) यांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या कॉर्नर बैठकांनी प्रचार कार्यक्रमाला सुरूवात झाली. आयोजन केवळ कॉर्नर बैठकांचे असताना या बैठकांनी सभेचे स्वरूप धारण केले होते. दरम्यान यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, बीड नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष

### मनोज मस्के यांचा राष्ट्रवादी काँग्रेस श.प. पक्षात जाहीर प्रवेश

प्रभाग क्रमांक १४ मधून उमेदवार असलेले बीड शहरातील संत नामदेव नगर येथील मनोज मस्के हे गेल्या २५ वर्षांपासून माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर, डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी आ.संदीप क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन गुरुवारी (दि.२०) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. दरम्यान ते त्यांनी दाखल केलेला उमेदवारी अर्ज मागे घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उ.बा.ठा.)पक्षाच्या उमेदवारांसाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या प्रवेश कार्यक्रमावेळी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पक्षातून हकालपट्टी होताच

## शिवसेना नेते ढसाढसा रडले;

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

पक्षाचा एबी फॉर्म जोडून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने ठाकरेंच्या शिवसेनेतून अहिल्यानगरच्या राहाता शहरातील निष्ठावान पदाधिकाऱ्यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षाने हकालपट्टी केल्यानंतर माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र पठारे आणि शहर समन्वयक भागवत लांडगे यांना अश्रू अनावर झाल्याचे बघायला मिळाले. जिल्ह्यातील ठाकरे सेना ही कोल्हे – थोरातसेना झाली असल्याचा आरोप पठारे यांनी केला असून आम्ही निष्ठावान राहिलो ही आमची चूक होती का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि ठाकरेंची शिवसेना हे स्थानिक आघाडी स्थापन करून राहाता नगरपरिषदेची निवडणूक लढवत आहेत. ही निवडणूक पक्षांच्या चिन्हांवर लढवली जावी असा आग्रह माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र पठारे आणि त्यांच्या समर्थकांचा होता. त्यामुळे पठारे यांनी वरिष्ठ पातळीवर हालचाली करत पक्षाचा एबी फॉर्म मिळवला आणि उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र आता पक्षाने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करत पक्षातून हकालपट्टी केली आहे.या कारवाईमुळे ठाकरेंच्या शिवसेनेतील अंतर्गत वाद चव्हाटच्यावर आला आहे. जिल्ह्यातील ठाकरेसेनेत बाळासाहेब थोरात यांचा मोठा हस्तक्षेप असून ही ठाकरेसेना नाही तर केटी सेना अर्थात कोल्हे – थोरात सेना झाल्याचा घणाघात राजेंद्र पठारे यांनी केला आहे. काही वर्षांपूर्वी विखे समर्थकांनी माझे घर जाळले, आंदोलनात अनेक केसेस अंगावर घेतल्या मात्र पक्ष सोडला नाही. बाळासाहेब थोरात कृषिमंत्री असताना आम्ही शेतकरी कर्जमाफीसाठी त्यांच्या घरावर कांदे फेकले होते, त्याचा बदला ते आता घेत आहेत. निष्ठावान शिवसैनिकांना असा न्याय मिळत असेल तर ते अयोग्य असून जिल्ह्यातील उद्धव साहेबांचा पक्ष संपवण्याचा थोरातांचा डाव असल्याचा आरोप पठारे यांनी केला आह

# अहिल्यानगरमध्ये बनावट दिव्यांग प्रमाणपत्र रॅकेटचा पर्दाफाश! नऊ आरोपी जेरबंद

## आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई । नऊ आरोपी जेरबंद; वैश्विक दिव्यांगत्व प्रणालीचा गैरवापर

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

**जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या वैश्विक दिव्यांगत्व प्रणालीचा आयडी व पासवर्ड चोरून शेकडो बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे तयार करणार्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश अहिल्यानगर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या आर्थिक गुन्हे शाखेने केला आहे. या प्रकरणी आतापर्यंत तब्बल ९ आरोपी निष्पन्न झाले असून, आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.**

अति. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी याबाबत तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा (क्र. १९८९/२०२५) दाखल केल्यानंतर, गुन्ह्याचा तपास पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्या आदेशाने आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता. पोलीस उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक योगेश जाधव तपास करत आहेत.

तपासात धक्कादायक माहिती उघड झाली आहे. सिव्हील हॉस्पिटल, अहिल्यानगर येथून १४२ दिव्यांग प्रमाणपत्रे डबल जाबक क्रमांक नोंदवून संशयास्पद रित्या वितरित करण्यात आली आहेत. पोलीस अधीक्षक यांनी स्वतः या तपासात लक्ष घालून जिल्हा शल्यचिकित्सकांना तातडीने १४२ प्रकरणांची माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या गंभीर गुन्ह्याच्या मुळापर्यंत जाण्यासाठी तांत्रिक मदत घेऊन पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणाबाबत माहिती असल्यास नागरिकांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे

# कापसाच्या शेतात गांज्याची लागवड करणाऱ्याचे पितळ स्था.गु.शाने केले उघड

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दि.१६/ ११/ २०२५ ते दि.२२/११/२०२५ या सप्ताहामध्ये जिल्हयातील सर्व उपविभाग व पोलीस स्टेशन पातळीवर एन.डी.पी.एस कायद्यान्वये कारवाई करण्याबाबत विशेष मोहीम राबवण्याचे आदेशीत केले होते. यावरुन मा. श्री. शिवाजी बंटेवाड पोलीस निरीक्षक स्था.गु.शा बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व पथक प्रमुख यांना सदर विशेष मोहीमे अंतर्गत कारवाई करण्याचे आदेशीत केले होत. दि २०/११/२०२५ रोजी पोउपनि महेश विघ्ने हे त्यांचे पथकासह परळी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहीती मिळाली की, हेळंब गावातील ईसम नामे युवराज अण्णा आंधळे रा. हेळंब याने शेत गट क्रं ७४६ मधील त्याचे मालकीचे कापसाचे शेतात अवैद्यरित्या गांज्या झाडाची लागवड केली आहे. सदरची माहीती पोउपनि महेश विघ्ने यांनी वरीष्ठांना कळवुन पोलीस स्टेशन परळी ग्रामीण चे प्रभारी अधिकारी पो.नि. सय्यद यांनी दिली. मा. वरीष्ठांची परवानगी प्राप्त करुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व पो.स्टे परोळी ग्रामीणचे पथक असे मिळुन बातमीदाराने सांगितलेप्रमाणे हेळंब गावातील शेत गट क्रं ७४६ मधील ईसम नामे युवराज अण्णा आंधळे याचे मालकीचे कापसाचे शेतात पंचासह छापा मारला असता त्याचे कापसाचे शेतात वजनी २५.९५० कि.ग्रॅम चा गांज्या किं. १,२९,७५० रू चा मिळुन आला. सदर ईसमास छापा कारवाईची माहीती मिळताच तो फरार झाला. आरोपी नामे युवराज अण्णा आंधळेरा. हेळंब ता. परळी जि. बीड याचे विरुध्द पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे पोउपनि अंकुश निमोणे यांनी सरकारतर्फ फिर्याद देवुन



गुन्हा नोंद केला आहे. याबाबत नागरीकांना अधिक माहीती असल्यास त्यांनी एन.डी.पी.एस सेल मो.क्र.८८८८८२४१०० वर संपर्क करुन माहीती देण्याचे आवाहान करण्यात आले आहे.सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक श्री. नवनीत कोंवत, अप्पर पोलीस अधिक्षक, श्रीमती. चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई, श्री व्यंकटराम, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, पो.नि सय्यद, पोउपनि श्री महेश विघ्ने, अंकुश निमोणे, रियाज शेख, पोहवा केकाण, जोगदंड, पोना भताने, पोशि अंधळे, घोडके चापोहवा मराडे यांनी केली आहे.

# श्री मल्हारी मार्तंड खंडोबा मंदिर वर्धापन दिनानिमित्त भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील उंद्री(प.दे) येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री मल्हारी मार्तंड खंडोबा मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त समस्त गावकरी मंडळींच्या वतीने भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.गावातील तसेच पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी उत्साहात सहभागी व्हावे,असे आवाहन आयोजन यात्रा महोत्सव समिती व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

यात्रा महोत्सवाची रुपरेषा पुढीलप्रमाणे जाहीर करण्यात आली आहे.ता १९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता भगवान खंडेरायाचा पारंपरिक जागरण कार्यक्रम,२० नोव्हेंबर रोजी रात्री ७ वाजता श्री मल्हारी मार्तंड खंडोबा पालखी सोहळा,२१ नोव्हेंबर रोजी सकाळी ८वाजता देवाची पूजा व आरती,सकाळी ९ वाजता महाप्रसाद,त्यानंतर यात्रा प्रारंभ,दुपारी २ वाजता पारंपरिक कुस्त्यांची दंगलीचे आयोजन करण्यात आले आहे.



यात्रेदरम्यान विविध धार्मिक विधी,भक्तिमय कार्यक्रम आणि पारंपरिक खेळांचे आयोजन होणार असून वातावरण भक्तिभावाने निनादणार आहे.परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा व यथोचित सहकार्य करावे असे आवाहन आयोजकांनी व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.



# घरकुल बांधकामाचा निधी तात्काळ द्यावा

घनसावंगी (प्रतिनिधी)

घरकुल योजनेअंतर्गत घनसावंगी तालुक्यातील शेकडो लाभार्थ्यांनी आपल्या कष्टाच्या बळावर घराचे बांधकाम पूर्ण करूनही सप्टेंबर महिन्यापासून आजतागायत त्यांना मंजूर निधी मिळालेला नाही. यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

शासनाच्या सर्व निकषांची पूर्तता करून, घरांचे बांधकाम पूर्ण केल्यानंतर देखील निधी वितरण रखडले आहे. अनेक लाभार्थ्यांनी कर्ज काढून घरे पूर्ण केली असून, आता त्यांना व्याजाचा भार आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.या पार्श्वभूमीवर घनसावंगी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यांच्यावतीने निवेदन देण्यात आले. या निवेदनात पुढील आठवड्याच्या आत निधी वितरणास सुरुवात न झाल्यास शांततामय आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देताना कल्याण सपाटे, भास्कर गाढवे, गणेश हेमके, गोपाल राजूरकर आदी उपस्थित होते. प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास संघर्ष उभा केला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# पर्यटन विकास समिती व पुरातत्व विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वारसा सप्ताहानिमित्त तेर येथे हेरिटेज वॉक संपन्न

धाराशिव ।प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने जागतिक वारसा सप्ताह निमित्त सहाय्यक संचालक (पुरातत्व), छत्रपती संभाजीनगर विभाग व पर्यटन जनजागृती संस्था धाराशिव, संचलित पर्यटन विकास समिती धाराशिव आणि पुरातत्व विभाग,कै.रामलिंगप्पा लामतुरे शासकीय पुराणवस्तू संग्रहालय महाराष्ट्र संत विद्यालय आणि तेरणा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तेर येथे हेरिटेज वॉकचे आयोजन संपन्न झाले.

तेर हे प्राचीन शहर असुन तेरला ऐतिहासिक असा पुरातत्व पर्यटनाचा वारसा लाभला असुन याची जनजागृती व्हावी यासाठी शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली जनजागृती रॅली काढण्यात आली,रॅलीत आमचे शहर प्राचीन तगर असा जयघोष करीत प्राचीन तेर याला दुजोरा देण्यात आला.त्रिविक्रम मंदिर,उतरेश्वर मंदिर सह इतर प्राचीन स्थळे व कै.लामतुरे प्राचीन वास्तु संग्रहालयाल येथे रॅलीचा समारोप करण्यात आला, पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष



युवराज नळे यांनी मार्गदर्शन केले तर नरहरी बडवे यांनी सुत्रसंचलन केले,आलेल्या मान्यवरांचे प्राचीन स्थळांविषयीचे पुस्तक व गुलाब पुष्प देऊन वास्तु संग्रहालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला,यावेळी पर्यटन विकास समितीचे अध्यक्ष युवराज नळे, मार्गदर्शक डॉ अभय शहापूरकर, मार्गदर्शक प्रा.अभिमान हंगरगेकर,उपाध्यक्ष गणेश वाघमारे,कोषाध्यक्ष बाबासाहेब गुळीग, सदस्य राजाभाऊ कारंडे,पुरातत्त्वज्ञ रविंद्र शिंदे,सदस्य विजय गायकवाड

# डॉ.चंद्रशेखर उजगरे यांचे हृदयवीकाराचे तीव्र झटक्याने निधन



माजलगाव (प्रतिनिधी)माजलगाव शहरातील ते खेळाडू म्हणुन सर्वपरिचित होते. सद्या ते वडवणी तालुक्याचे पशुधन वैद्यकीय अधिकारी होते.उत्तम खेळाडू आणि नेहमीच हसतमुख असणारे डॉ.चंद्रशेखर उजगरे (वय ५३) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने अचानक निधन झाल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी घडली.दररोजप्रमाणे पहाटे सोळंके महाविद्यालयाच्या ट्रॅकवर व्यायाम करताना त्यांना अचानक झटका आला आणि ते जागेवरच कोसळले.नागरिकांनी त्यांना तातडीने एका खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल केले.परंतु तोपर्यंत त्यांनी जगाचा निरोप घेतला होता.त्यांचे पश्चात आई,पत्नी,एक भाऊ,दोन बहिणी, एक मुलगी,एक मुलगा असा परिवार आहे.



# शेरे मैसूर शहीद हजरत टीपू सुल्तान यांच्या जयंती वाटुर फाटा येथे उत्साहत साजरी

परतूर /तारेख शेख

हजरत टिपू सुलतान यांच्या २७५ वी जयंती निर्मिती वाटुर फाटा येथे उत्साहात साजरी करण्यात आली आहे तसेच हजर टीप सुलतान यांचा जन्म २० नवंबर १७५० देवनहल्ली मैसूर साम्राज्य येथे झाला होता तसेच वाटर फाटा येथे शेरे मैसूर हजरत टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्रित साजरी केली आहे तसेच सर्वधर्म समभाव असा संदेश देण्यात आला असून वाटुर येथील सर्व महापुरुषांचे झेंडे बदलून एको अमन शांतीचा संदेश देण्यात आला याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य माजी सरपंच, माजी जिल्हा परिषद सदस्य व सर्व व्यापारी उपस्थित होते

या कार्यक्रमात आपले विचार सय्यद आसद लक्ष्मण शिंदे बाळासाहेब अंभीरे यांनी व्यक्त केले सय्यद असद यांनी हजरत टिपू सुलतान यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व इंग्रजांसोबत कशा प्रकारे लढले व इंग्रजांची नीती समजून भारतावर राज्यकर्ते इंग्रज कसे बनले त्याला कडाडून विरोध केला व त्यांनी आपले विचार शायरी मधून सांगितले शहादत का जुनून और जजबा ए इमान बनता है

मोहब्बत अमन और इन्साफ की पहचान बनता है कलेजा शेर का, चिते की फुर्ती, जिस्म इन्सा का ये सब मिल जाये तो टिपू सा एक सुलतान बनता है

अशाप्रकारे सय्यद असद यांनी आपले विचार मांडलेलक्ष्मण शिंदे यांनी आपल्या विचार मांडताना छत्रपती शिवरायाप्रमाणे समाजसलोखा व बांधिलकी जपणारे हजरत टिपू सुलतान राजे होते त्यांनी प्रत्येक मंदिराला देणग्या दिल्या व सर्व जाती पण त्यांना सोबत घेऊन चालले असे विचार मांडले.

बाळासाहेब अंभीरे यांनी आपले विचार मांडत असताना टिपू सुलतान हे खूप शिक्षित आणि वैचारिक व्यक्तिमत्व होते भारतातील पहिले मिसाईल मॅन म्हणून ओळखले जाणारे हजरत टिपू सुलतान हे होते असे विचार त्यांनी मांडले शेवटी आभार प्रदर्शन असद सय्यद यांनी केले कार्यक्रम यशस्वी पूर्ण करण्यासाठी हजरत टिपू सुलतान युवा मंच वाटुर व सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली



गडब/सुरेश म्हात्रे

**आमदार अनिकेत भाई तटकरे ह्यांच्या नेतृत्वखाली महायुतीत पेण नगरापालिका निवडणूक लढवीत असून पेण नगरपालिका निवडणूक राष्ट्रवादी कॉंग्रेस भाजप महायुतीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार पेण चे माजी उपनगराध्यक्ष दिपक गुरव ह्याची नगरसेवक पदासाठी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना पेण तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष दयानंद भगत तालुका उपाध्यक्ष महेंद्र वर्तक व पदाधिकारी उपस्थित होते पेण नगरापलिका निवडणूक मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे दोन नगरसेवक बिनविरोध झाले असून सौ वसुधा पाटील व दिपक गुरव ह्यांचे पेण तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे अभिनंदन केले आहे ह्या नवनिवार्चीत नगरसेवक ह्यांचे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरनीय खासदार सुनील तटकरे साहेब महिला व बालकल्याण मंत्री मा ना आदिती ताई तटकरे पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर तालुका अध्यक्ष दयानंद भगत ह्यांनी अभिनंदन केले आहे.**

# बीडचे महादेव मातकर आरोग्यदूत पुरस्काराने सन्मानित

## ठाणे येथील शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचा गौरवसोहळा थाटात !

ठाणे ।प्रतिनिधी

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात बीड जिल्ह्यातील रुग्णसेवेसाठी अत्यंत मोलाचे योगदान देणारे रुग्णसेवक महादेव मातकर यांचा आरोग्यदूत पुरस्कार देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

वैद्यकीय क्षेत्रातील समाजकेंद्रित कार्य, गोरगरीब घटकांतील शेकडो रुग्णांना दिलासा आणि मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून तब्बल १५ कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून देण्याचा विक्रम या सर्व कामगिरीचा गौरव करत मातकर यांचा राज्यस्तरीय सन्मान झाला.

या कार्यक्रमात डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, ठाणे महानगरपालिका तसेच शिवसेना नेतृत्वाने संयुक्तपणे हा सन्मान प्रदान केला. महापौर मीनाक्षी ताई शिंदे, उपमुख्यमंत्री तथा नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेशजी चिवटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष रामराव सर यांच्या हस्ते मातकर यांना आरोग्यदूत पुरस्काराचे मानचिन्ह प्रदान करण्यात आले.शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या स्थापनेला यावर्षी आठ वर्षे पूर्ण झाली असून, या कालावधीत ठाणे विभागात हजारो रुग्णांना मोफत मार्गदर्शन, औषधोपचार, आपत्कालीन मदत आणि विविध वैद्यकीय शिबिरांद्वारे सेवा देण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर वैद्यकीय क्षेत्रात विशेष उल्लेखनीय काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम वर्षानुवर्षे राबविला जात आहे.महादेव मातकर यांनी आपल्या प्रतिसादात सांगितले की, हा पुरस्कार केवळ माझा नसून बीड जिल्ह्यातील त्या सर्व गोरगरीब कुटुंबांचा आहे ज्यांच्यासाठी आम्ही दिवसरात्र धावपळ केली. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांचा जीव वाचवणे हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे आणि पुढेही हे काम अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील.



कार्यक्रमात विविध वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कार्याध्यक्ष रामराव सर यांनी सांगितले की, वैद्यकीय सेवा हा पक्षाच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक असून अशा सेवाभावी व्यक्तींना प्रोत्साहन देण्याचा हा उपक्रम अधिक विस्तारला जाईल.

महापौर मीनाक्षी ताई शिंदे यांनी रुग्णसेवक मातकर यांच्या कामाचे कौतुक करताना म्हटले की, बीड जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेतील कमतरता असूनही त्यांनी शेकडो रुग्णांना शासनाच्या विविध यंत्रणांशी जोडून दिले, हे अत्यंत प्रशंसनीय कार्य आहे. तर मंगेशजी चिवटे यांनी राज्य सरकारतर्फे राबविल्या जाणाऱ्या आरोग्य योजनांचा लाभ प्रत्येक गरजू नागरिकापर्यंत पोहोचवण्याची गरज अधोरेखित केली.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सोशल मीडिया विभागातील विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती जाहीर

धाराशिव / बिलाल कुरेशी

धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष म्हणून दशरथ चाबुकस्वार, धाराशिव जिल्हा सरचिटणीस म्हणून राहुल गुरव, परंडा तालुकाध्यक्ष म्हणून ऋषिकेश पाटील, तुळजापूर तालुकाध्यक्ष म्हणून शशिकांत गायकवाड, तर लोहारा तालुकाध्यक्ष म्हणून अनिल जांभळे यांची नियुक्ती करण्यात आली.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, माजी उपनगराध्यक्ष खलिफा कुरेशी, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस प्रदेश सचिव आदित्य पाटील, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अविनाश तांबारे,



राष्ट्रवादी सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अफसर मुल्ला, तसेच गजानन खर्चे आणि इस्माईल शेख यांची उपस्थिती होती.आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांची विचारधारा तळागाळात पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे. नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी या माध्यमातून पक्ष संघटना अधिक बळकट करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांच्या पुढील कार्यासाठी डॉ. प्रतापसिंह पाटील जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, धाराशिव यांनी शुभेच्छा दिल्या.

# भाजपचे सक्रिय कार्यकर्ते हबीबभाई पठाण यांचा असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादीत प्रवेश

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील प्रभाग क्रमांक ०४ इस्लामपुरा येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते हबीबभाई पठाण यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भाजपाला सोडचिठ्ठी देत माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मा.अमरसिंह पंडित व गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

गेवराई तालुक्यात भाजपला मोठ्या प्रमाणावर गळती लागली असून शहरातील प्रभाग क्र.४ येथील भाजपचे सक्रिय कार्यकर्ते हबीबभाई पठाण यांनी भाजपला सोडचिठ्ठी देत माजी आमदार अमरसिंह पंडित व गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दि. १९ बुधवार रोजी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला. यावेळी अमरसिंह पंडित यांनी त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये स्वागत केले. यावेळी महेश दाभाडे, उमेदवार दादासाहेब घोडके, शाहरुख पठाण, बाजार समितीचे माजी सभापती मुजीब पठाण, मंजूर बागवान, राजू पठाण, समीर पठाण, साजिदभाई, अखिलभाई, अपसरभाई, शेरखान ताहेरखान, सनाउल्ला पठाण, फारुख भाई, अदनान शेख, शहबाज भाई, अन्सर खा पठाण, वाजेद भाई, रहीम भाई, सलमान पठाण सह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# माजी सैनिक कैलास रेडेकर यांच्या श्री बेलेश्वर प्रॉडक्ट्सला ग्राहकांकडून वाढता प्रतिसाद

आष्टी ।प्रतिनिधी

स्थानिक स्तरावर दुग्धउत्पादन क्षेत्रात कार्यरत असलेल्या रेडेकर बंधू यांच्या श्री. बेलेश्वर मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स या नवीन व्यवसाय उपक्रमाला अलीकडे ग्राहकांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. दररोज २०० लिटर म्हशीचे दूध शहरात विक्री केले जात आहे. उच्च दर्जा, स्वच्छता आणि शुद्धतेवर आधारित उत्पादनपद्धतीमुळे या संस्थेने ग्राहकांमध्ये विश्वास संपादन केला आहे. बेलेश्वरच्या माध्यमातून दूध, दही, पनीर, खवा, श्रीखंड, आम्रखंड, मलई, लस्सी, स्पेशल रबडी, सिताफळ रबडी, बासुंदी, मसाला ताक, बदाम शेक, कंदीपेडा आणि मलई पेढा अशी विविध दुग्धजन्य उत्पादने त्यांच्या कंपनीत केले जातात. उपलब्धतेचा दर्जा आणि चव यामधील सातत्य ही या उत्पादनांची मुख्य वैशिष्ट्ये मानली जातात. ग्राहकांच्या अभिप्रायानुसार, संस्थेची उत्पादने घरगुती स्वरूपाची चव आणि विश्वसनीय गुणवत्ता प्रदान करतात. यामुळे स्थानिक बाजारपेठेत या ब्रँडची मागणी सातत्याने वाढत असून संस्था दुग्धव्यवसायात एक विश्वासार्ह नाव म्हणून उदयास येत आहे. शिवाय नुकतीच बेलेश्वरच्या वतीने गुलकंद आणि मावा कुल्फीचे नवीन पदार्थ बाजारात उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या कुल्फीने ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर भुरळ घातल्याचे चित्र आहे. सुमारे २५ लक्ष रुपये खर्च ही कंपनी माजी सैनिक कैलास रेडेकर यांनी उभे केले आहे. पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग या योजनेअंतर्गत त्यांना १० लाख रुपयांचे अनुदान (सबसिडी) मिळाले आहे. काल या कंपनीमधून नव्याने उत्पादित होणारे मावा कुल्फी या प्रॉडक्टचे उद्घाटन करण्यात आले.






# शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

आष्टी ।प्रतिनिधी

सामाजिक व पत्रकारीच्या माध्यमातून नेहमीच समाजहिताचे उपक्रम राबवणारे, शिवरायांचा मुस्लिम मावळा तथा आ. लोकनेते सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक, आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेले समीर शेख शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित झाले.

सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, गावरान मस्ती फेम वैभव कुऱ्हाडे (गंठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, झुंजार नेता चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजी लोकशक्ती राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समीर बादशहा शेख यांना देऊन सन्मान करण्यात आला.

तर या अगोदर दि. ७ सप्टेंबर २०२५ या दिवशी राज्यस्तरीय युवक आधार शिव रत्न पुरस्कार व २०२४ - २५ या वर्षाचा राज्यस्तरीय मौलाना अब्दुल कलाम आझाद समाजसेवा पुरस्कार व २०२२ - २३ यशवंत रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. समाजात हिंदू - मुस्लिम ऐक्य आणि सलोखा टिकवण्यासाठी शेख यांनी केलेल्या प्रयत्नांची आजवर विविध स्तरावर दखल घेण्यात आली. सामाजिक क्षेत्रातील त्यांचे योगदान, पत्रकारितेत मानले जाणारे प्रश्न आणि जनतेशी असलेला दैनंदिन संवाद यामुळेच त्यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव बोडखे, ग्रामविस्तार अधिकारी बाळासाहेब थोरवे, सरपंच दत्तात्रय खोटे, सरपंच परिवंत गायकवाड, सरपंच अजित घुले, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, कल्याण वाल्हेकर, विष्णू नन्नवरे, सरपंच विठ्ठल राख, आनंद देवा, राजेंद्र बोराडे, प्रविण खाडे, अध्यक्ष महेश भगत, बाबासाहेब भोसले, पत्रकार मारुती सत्रे, महेश खिलारे, उमेश सुरवसे, अर्जुन थोरात, अशोक गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. समाजसेवक समीर शेख यांना सर्व स्तरावरून कौतुक व शुभेच्छा यांचा वर्षाव होत आहे.

# पंडीत नेहरू विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक कल्याण वाल्हेकर लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

## सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. राठोड यांच्या हस्ते झाला सन्मान

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील हाजीपुर सारख्या ग्रामीण भागातून हलाकीच्या परिस्थितीवर मात करत शिक्षण घेऊन १९९४ साली शिक्षक म्हणून कार्य सुरू केले. शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातील ही मुले घडली पाहिजेत नुसती घडलीच नाही तर चांगले संस्कार देखील देऊन हजारो विद्यार्थी घडविण्यासाठी मागिल ३२ वर्षापासून ज्ञानार्जनाचे पवित्र कार्य करणारे आदर्श शिक्षक कल्याण वाल्हेकर यांनी शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यबद्दल अनेक पुरस्कार प्राप्त आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकशक्ती महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२५ लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक या पुरस्काराने शनिवारी दैनिक लोकशक्तीच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित आले. सिने अभिनेत्री चित्रा दिक्षित, नागपूर येथील अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. दत्ताराव राठोड, गावरान मस्ती फेम वैभव कुऱ्हाडे (गठणकुमार), ज्येष्ठ साहित्यिक ऐश्वर्य पाटेकर, डॉ. कैलास दौंड, झुंजार नेता चे उपसंपादक उत्तमराव बोडखे, संपादक विजय लेंडाळ, सहसंपादक इम्रान शेख, पत्रकार जावेद सय्यद व इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.




आष्टी तालुक्यातील हाजीपुर येथील अतिशय सामान्य कुटुंबातून शिक्षण घेऊन आपल्या ज्ञानार्जनाच्या कार्यातून मागील ३२ वर्षांमध्ये अनेक विद्यार्थी घडवले. डॉक्टर, वकील, इंजिनियर, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे हजारो विद्यार्थी नावलौकिक असून त्यांच्या दिलेल्या ज्ञानार्जनामुळे तरुण पिढी घडली आहे. अनेकांचे आयुष्य घडवणारे आदर्श शिक्षक तालुक्यात आप्पा या नावाने परिचित आहेत. मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांच्याकडे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत असून अभ्यासाची ही त्यांना गोडी लागत आहे. त्यांनी केलेल्या कार्यामुळे अनेक पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आष्टी येथे गेली १६ वर्षापासून शिक्षक म्हणून न्यायदानाचे पवित्र कार्य करीत आहेत. मागिल ३२ वर्षांमध्ये हजारो विद्यार्थी घडविले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना शनिवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी अहील्यानगर येथील हॉटेल यशग्रँड येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात लोकशक्ती महाराष्ट्र गौरव आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्याबद्दल ज्येष्ठ शिक्षक कल्याण वाल्हेकर यांचे शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार भिमरावजी धोंडे, युवा नेते अजय दादा धोंडे, अभय राजे धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, डॉ. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, संदीप नन्नवरे, सागर वाघुले, पंडित शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य सुरेश बोडखे, माजी सरपंच विठ्ठल राख, हाजीपुर समस्त ग्रामस्थ, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर व पंडित शाळेचे सर्व सहकारी शिक्षक - शिक्षिका, शाळेचे विद्यार्थी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# झोपडपट्टीतील चिमुकल्यांना मायेची उब देऊन घडवणारे शिक्षक

## चोभानिमगाव अंतर्गत झोपडपट्टी शाळेच्या गुणवत्तेचे तोंडभरुन कौतुक

आष्टी ।प्रतिनिधी

शिक्षणातून विद्यार्थी घडत असतात परंतु हे शिक्षण देण्यासाठी अभ्यासू प्रभावशील, व्यक्तिमत्त्वाच्या गुरुजींची आवश्यकता असते. त्यासाठी नियमित शिक्षक भरती आवश्यक असते परंतु गत अनेक वर्षापासून अनेक शाळांना शिक्षक नाहीत, तरीसुद्धा शिक्षक बांधव शिक्षण क्षेत्रातील कसरत योग्य करत आणि ऑनलाईन काम करून विद्यार्थ्यांना घडवतात. आष्टी तालुक्याच्या चोभानिमगाव अंतर्गत झोपडपट्टी भागातील या शाळेतील बहाद्दर शिक्षक बांधवांनी विद्यार्थ्यांना ज्ञानसंपन्न आणि संस्कारातून पुढे जाण्याचा मार्ग दाखवल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव अंतर्गत असलेल्या झोपडपट्टी येथील जि. प. प्राथमिक शाळा पहिली ते चौथी या चार वर्गामध्ये ८२ विद्यार्थी पटसंख्या आहे. येथे मुख्याध्यापक म्हणून हनुमंत जाधव, सहशिक्षक अशोक झगडे, हरदास ढोबळे हे तीन शिक्षक अध्यापनाचे कार्य करत आहेत. या तीनही शिक्षकांनी अत्यंत प्रमाणिकपणे जीव ओतून या अत्यंत ग्रामीण सर्वसामान्य परिवारातील विद्यार्थ्यांना घडवून समाधान घेण्याचा प्रयत्न केला आहे. या शिक्षकांना शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य तसेच सर्व पालकांचे सहकार्य मिळते. या शाळेतील विद्यार्थी भविष्यात विविध क्षेत्रात जाऊन आपला नावलौकिक करतील याचा विश्वास आता पालकांनाही वाटू लागला आहे.



आष्टी तालुक्यातील झोपडपट्टी भागातील ही एकमेव शाळा आहे की, ज्या शाळेमध्ये ८० विद्यार्थ्यापेक्षा जास्त विद्यार्थी संख्या आहे. याचे सर्व श्रेय या शाळेतील अत्यंत आनंददायी शिक्षण देणारे व उपक्रमशील आणि अध्यापनाचे पवित्र काम करणारे शिक्षकांना जाते. हे शाळा आष्टी तालुक्यातील आदर्श शाळा होईल अशी मला खात्री आहे असे मत ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी शाळेला भेट दिल्यानंतर व्यक्त केली.

पहिली ते चौथी वर्गात ८२ पटसंख्या

अत्यंत ग्रामीण भागामध्ये असलेल्या या झोपडपट्टी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये इयत्ता पहिली ते चौथी वर्ग आहेत. या चार वर्गामध्ये सध्याच्या स्थितीमध्ये सुद्धा एकूण ८२ विद्यार्थी शिक्षण घेत असून ही पटसंख्या सध्याच्या काळामध्ये या शिक्षकांच्या कार्य शिक्षामार्फत करणारी आहे. दरम्यान ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी शाळेला आवर्जून भेट देत माहिती घेतली असता उपक्रमशील आणि आनंददायी अध्यापन कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करून शिक्षक बांधवांचे अभिनंदन केले.

# आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नांमुळे अमळनेर परिसरात दिवसा वीजपुरवठा

## बिबट्याच्या दहशतीतून शेतकऱ्यांची सुटका

पाटोदा ।प्रतिनिधी

अमळनेर परिसरातील डोंगराळ भागात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना अंधारात शेतीला जाणे जीवघेणे ठरत होते. ही गंभीर परिस्थिती माजी जिल्हा परिषद सदस्य माऊली आप्पा जरांगे यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या निदर्शनास आणताच त्यांनी महावितरण अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार महावितरणकडून त्वरीत निर्णय घेत बुधवार, १९ नोव्हेंबरपासून अमळनेर परिसरात दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती उपअभियंता ए. एन. शेख यांनी दिली. नवीन वेळापत्रकानुसार अमळनेर फिडर सकाळी ६ ते १२ आणि हातोला फिडर दुपारी १२ ते ६ अशी वेळ निश्चित झाली आहे. या निर्णयामुळे दहा-पंधरा गावांतील शेतकऱ्यांना बिबट्याच्या भीतीतून मोठा दिलासा मिळाला असून कोतनचे सरपंच महेश खेंगरे व शेतकरी कोमखले यांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि माऊली आप्पा जरांगे यांचे मनापासून आभार मानले आहेत.



# बांधकाम व्यवसायात यशस्वी चेहरा इंजि. बाळासाहेब बोडखे

आष्टी ।प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील आदर्श गाव आनंदवाडी - सराटेवडगाव या छोट्याशा गावात जन्मलेले इंजिनिअर बाळासाहेब सुखदेव बोडखे यांनी अभियंता म्हणून पदवी प्राप्त केल्यानंतर कडा शहरामध्ये २०१८ साली बोडखे इंजिनिअर अँड डेव्हलपर्स हे ऑफिस सुरू केले. सात वर्ष जिद्द, चिकाटी, मेहनत करून रेसिडेन्सीयल इमारती उभ्या करून वैयक्तिक बांधकाम करून निवासस्थान विक्री केली आहेत.



आजपर्यंत ६०० टुमदार बंगले कडा व शहर व परिसरात त्यांनी बांधले आहेत. इंजिनिअर बाळासाहेब सुखदेव बोडखे, इंजिनिअर योगेश नवनाथ बोडखे यांच्या नियंत्रणाखाली जागा घेऊन मटेरियलसह बांधकाम करून बंगले विक्री केले आहेत. बांधकाम व्यावसायिक म्हणून त्यांनी आपला तालुक्यातच नव्हे तर बीड जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त केला आहे. प्लॅनिंग, कन्स्ट्रक्शन, डिझायनिंग, इस्टिमेट, आर्किटेक्चर्स, टू डी, थ्री डी एलेवेशन, (सजावट) प्लॉटिंग आरसीसी कन्सल्टट आदी कामे इंजिनिअर बोडखे हे करीत आहेत. सात वर्षाच्या या यशस्वी कारकिर्दी नंतर त्यांचे अभिनंदन केले जात आहे. आदर्श गाव सराटेवडगाव - आनंदवाडी ग्रामपंचायतचे सरपंच भीमराव बोडखे यांचे ते बंधू आहेत.

# काँग्रेसच्या माजलगांव तालुकाध्यक्षपदी दत्ता कांबळे यांची निवड

## नगरपरिषद निवडणूक तोंडावर काँग्रेसचा मोठा बदल



माजलगाव ।प्रतिनिधी

येथील काँग्रेसचे चळवळीतील कार्यकर्ते दत्ता लक्ष्मण कांबळे यांची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने माजलगाव तालुका काँग्रेसच्या प्रभारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.भाजप शासनाच्या जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणा-या धोरणावर तसेच सर्वसामान्य जनतेला भेडसावणा-या महागाई आणि भ्रष्टाचार या सारख्या गंभिर विषयावर जागरूकता निर्माण करण्यासाठी दिवसरात्र झटत धर्मनिरपेक्ष आणि सर्व समावेशक विकास देणारे काँग्रेस सरकार राज्यात व देशात आणण्यासाठी मेहनत घेण्यासाठी आणि पक्षाला बळकटी देण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या दत्ता कांबळे यांची काँग्रेसच्या माजलगाव तालुकाध्यक्ष प्रभारीपदी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे, देशाच्या नेत्या सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रमेश चेन्नीथला, खा. रजनी पाटील, मा. मंत्री अशोकराव पाटील, आदित्य पाटील, जिल्हा प्रभारी धिरज देशमुख, जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांनी निवड केली असुन त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.



# लोक विकास महाआघाडीचे बळ वाढले ; समाजवादी पार्टीचा जाहीर पाठिंबा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोक विकास महाआघाडीला बुधवारी मोठा राजकीय हातभार मिळाला आहे. समाजवादी पार्टीने पत्रकार परिषद घेऊन लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व महाआघाडीच्या नगरसेवकपदासाठी उभ्या असलेल्या सर्वच उमेदवारांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. यामुळे लोक विकास महाआघाडीचे बळ वाढले आहे. पाठिंबा देणाऱ्या समाजवादी पार्टीचे लोकविकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी यांनी जाहीर आभार मानले आहेत. तर भाजप समर्थक विरोधकांच्या कोणत्याही भुलथापांना बळी न पडता सुज्ञ मतदारांनी लोक विकास महाआघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व सर्वच प्रभागातील नगरसेवकपदाच्या उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन समाजवादी पार्टीच्या वतीने अंबाजोगाईतील सर्व सुजाण जनतेला करण्यात आले आहे.

अंबाजोगाईत बुधवार, दिनांक १९ नोव्हेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ॲड.शिवाजी कांबळे यांनी सांगितले की, पापा मोदींच्या नेतृत्वाला अंबाजोगाईकरांची नेहमीच पसंती मिळाली आहे. अंबाजोगाईचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जनतेला पुन्हा एकदा पापा मोदी हेच नगराध्यक्ष म्हणून हवे आहेत. आम्ही आज या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून लोक विकास महाआघाडीला जाहीर पाठिंबा देत आहोत. असे ॲड.कांबळे म्हणाले. तर यावेळी बोलताना समाजवादी पार्टीचे अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले आहे की, लोक विकास आघाडीवर अंबाजोगाईकरांचा मोठा विश्वास आहे.

## शिवसेना जिल्हाप्रमुख विनय गिरडे यांच्या वतीने

# आयोजित महावितरण वीजबिल दुरुस्ती मेळाव्यात शैकडौ नागरिकांचा तक्रारींचे निवारण

नवीन नांदेड -सिडको हडको भागातील महावितरण कडुन विजबिल दुरूस्ती मेळावा शिवसेनेचे जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या सिडको येथील जनसंपर्क कार्यालयात दि २० नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या विज बिल दुरूस्ती मेळाव्यात शेकडो तक्रारीचे निवारण अभियंता, कर्मचारी यांनी केले असून अनेकांनी या उपक्रमाचे अभिनंदन केले आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून विज ग्राहकांना जादा रक्कमेची बिले,जादा रिंडीग या बाबत विज ग्राहकांमध्ये तिव्र संताप व्यक्त होत होता, जादा बिले येत असल्या मुळे अनेक नागरीकांनी अनेक वेळा चकरा मारूनही दुरूस्ती होत नव्हती अखेर या बाबत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या कडे अनेक विज ग्राहकांसह नागरीक व महिला युवक यांनी संपर्क साधला,अखेर या बाबत वरीष्ठ अधिकारी यांनी संपर्क साधुन सिडको परिसरात दि २० नोव्हेंबर रोजी मेळावा घेतला यावेळी महावितरण विभागाचे अधीक्षक अभियंता सुधाकर जाधव,कार्यकारी अभियंता विनय घनबहादुर,अतिरिक्त कार्यकारी अभियंता सौ. शोभा पिंगलवाड ,सहायक अभियंता आडबे,सहायक लेखापाल भागवत,अजहर पठाण,वरिष्ठ लिपिक सौ.भालेराव,कनिष्ठ लिपिक सौ.सोनाली गीते,गजानन भोसले, राकेश मुत्यालवार,निब्बान तिरमले, रामदास आवळे,स्वप्नील नगारे,सुरेश घुगे ,सोनू कांबळे यांनी आलेल्या नागरिक यांच्या विजबीला तील आलेली जादा रक्कम, मीटर बदलणे, चुकीची बिले दुरुस्ती करणे , नादुरुस्त मीटर बदलणे,यासह अनेक अडचणी सोडविण्यात आल्या ,यावेळी आलेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले मेळावा यशस्वीतेसाठी रवी थोरात ,रवी रायबोळे, माधव दाडेल यांनी परिश्रम घेतले. गेल्या अनेक महिन्यांपासून विज ग्राहकांची होणारी तक्रारी अखेर जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या पुढाकाराने सुटल्याने त्यांनी राबविलेल्या या मेळाव्याचे अभिनंदन केले.

# देगलूर आगार भंगार गाड्या; खिळखिळ खिडकीतून करावा लागतो प्रवास

देगलूर /प्रतिनिधी

काही दिवसापूर्वी येथील रा प आगार प्रमुखांनी मुलाखत देऊन आम्ही विक्रमी उत्पन्न मिळवले असे सांगितले, परंतु या मध्ये सर्वात जास्त श्रेय प्रवासी नागरिकांना जाते, कारण प्रवाशी मग तो फुल्ल तिकीट वाला, महिला अथवा जेष्ठ असो, प्रवाशी भाड्याची रकमेची परिपूर्ती महाराष्ट्र शासन करते,जर एवढे उत्पन्न मिळुनही एस.टी. महामंडळ प्रवासीची गैरसोय का करते, चांगल्या मूलभूत सोईसुविधा का देत नाही? याचे ताजे उदाहरण म्हणजे दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी गंगाधर गुंगेवार यांना आलेला कटू अनुभव! ते स्वतः पत्नी सह देगलूर च्या जुन्या बस स्थानक येथे पहाटे ५- १० मिनिटाला आले, ४- ४५ वाजता निघणारी पुणे बस ५-१५ मिनिटांनी उशिरा निघाली, नांदेडला जाणारी ५- ३० ची बस सकाळी ६-१० पर्यंत आली नाही नाईलाजाने त्यांना ६ ची एम. एच. २० बी. एल. १९९३ क्रमांकाची बस ६-१० ला सुटली. रा. प. महामंडळ च्या भंगार झालेला या बसमधून भिजत प्रवास करत गाड्यांच्या खिळ, खिळया झालेल्या खिडकीतून आलेल्या गार हवेने थंडीत गारटून जाऊन नाईलाजाने तुटक्या बाकावर बसून प्रवास करावा लागतो, हे दुर्दैव..!



महामंडळ म्हणते प्रवासाच्या सेवेसाठी?

आज सकाळी नांदेडला पुण्याला जाणाऱ्या प्रवासी नागरिकांचे हाल झाले त्याची देगलूर आगार प्रमुख दखल घेतील काय? भविष्यात तरी गाड्या वेळेवर सोडण्याची काळजी घेतील अशी अपेक्षा प्रवासी करीत आहेत.

# कंधार नगरपरिषद प्रशासन निवडणुकीसाठी सज्ज ; केंद्राध्यक्षासह अधिकाऱ्यांना प्रशिक्षण



कंधार (प्रतिनिधी)

कंधार नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे मतदान २ डिसेंबर रोजी होणार आहे. त्याअनुषंगाने कंधार नगरपरिषद निवडणूकीचे मतदान प्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावरील केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी सज्ज असून निवडणूक प्रक्रियांचे प्रशिक्षण पार पडले. सदरील प्रशिक्षणास निवडणूक निर्णय अधिकारी रामेश्वर गोरे यांनी पी.पी.टी.द्वारे सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी संदिप भोळे व अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णयअधिकारी रेखा चामणर यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. सदरील प्रशिक्षणासाठी मतदान केंद्राध्यक्ष ४०, मतदान अधिकारी ०१-४०, मतदान अधिकारी ०२-४०, व मतदान अधिकारी ०३-४० असे एकूण १६० कर्मचारी उपस्थित होते. व राखीव कर्मचारी २० प्रशिणासाठी उपस्थित होते. तसेच १४ क्षेत्रिय अधिकारी प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ०८ मास्टर्स ट्रेनर्स उपस्थित होते तर अनुपस्थित कर्मचाऱ्यांना नोटीस देण्यात आली.

# महायुती स्वबळावर तर 'मविआ' वंचित सोबत

कंधार /प्रतिनिधी

दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या कंधार नगर पालिका निवडणुकीत भाजपतर्फे गंगाप्रसाद यंन्नावार, कॉंग्रेस वंचित बहुजन आघाडीतर्फे शहाजी नळगे तर राष्ट्रवादी अजित पवार पार्टी तर्फे स्वप्निल पाटील लुंगारे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. या निवडणुकीत महायुतीतील भाजप व राष्ट्रवादी पक्ष स्वबळावर उतरल्याने कोण विजयी होणार हे आज घडीला सांगणे अवघड आहे.

पालिका निवडणूक महायुती व ' मविआ ' एकत्रपणे लढतात की स्वबळावर यावर अनेक दिवस चर्चा रंगली होती. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण व कंधारचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्यातील राजकीय शत्रुत्व जिल्ह्यात प्रसिद्ध असल्याने जिल्ह्यात एखादे वेळी युती झाली तरी कंधारमध्ये मात्र भाजप व राष्ट्रवादीतील युती अभेद राहणार नाही, राष्ट्रवादी स्वबळावर लढणार असे बोलले जायचे. अन् झालेही तसेच. कंधार मध्ये महायुती अभेद राहिली नाही.



शहाजीराजे नळगे | अड. गंगाप्रसाद यन्नावार | स्वप्निल पा. लुंगारे

**कंधार पालिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत होणार तिरंगी लढत**

नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची तारीख दोन दिवसावर आली असल्याने कोण कोणते अपक्ष उमेदवार अर्ज मागे घेणार आणि कोण कोण अर्ज ठेवणार हे २१ नोव्हेंबरला कळणार आहे. त्यामुळे कोणत्या पक्षाची लढत कोणत्या पक्षाच्या उमेदवार सोबत होईल हे स्पष्ट होईल. विविध पक्षांना पैकीला पैकी उमेदवार मिळाले नसल्याने मतदारांत एक चर्चेचा विषय बनला आहे. उपऱ्या उमेदवारांना काही पक्षाने उमेदवारी दिली आणि पक्षाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी नाकारल्याने काही जणांनी दुसऱ्या पक्षाची उमेदवारांनी घेतली तर काही कार्यकर्ते उमेदवारी दिली नसल्याने आपल्या नेत्यावर संताप व्यक्त करीत आहेत.

अध्यक्षपदासाठी आठ अर्ज भरण्यात आले होते. त्यातील तीन अर्ज दि. १८ रोजी बाद ठरले आहेत. सदस्य पदासाठी एकूण १२० अर्ज भरण्यात आले होते. छाननीत २० अर्ज अपात्र ठरले आहेत. आता १० प्रभागात १०० तर अध्यक्षपदासाठी ५ अर्ज आहेत. २१ नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असून त्या दिवशी नगरपरिषद निवडणुकीत कोण राहणार , कोण नाही याचे चित्र स्पष्ट होणार आहे.

# हिमायतनगर तालुक्यात राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहीमेचा जोरदार प्रतिसाद

## घराघरांत जाऊन संशयित कुष्ठ रुग्णांची तपासणीत नागरिकांचा प्रतिसाद

हिमायतनगर /हिमायतनगर

केंद्र व राज्य सरकारच्या पुढाकाराने दि १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय कुष्ठरोग शोध मोहिमेला हिमायतनगर तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून संपूर्ण आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत आहे. तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक-सेविका तसेच आशा स्वयंसेविका व स्वयंसेवक यांच्यामार्फत घरोघरी भेट देऊन कुष्ठरोगाच्या संशयित रुग्णांचा शोध घेण्याचे काम वेगाने सुरू आहे.



मोहिमेअंतर्गत केवळ घरभेट नव्हे तर शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, गावांमधील मंदिरावरील लाऊडस्पीकर, दवंडी आणि विविध प्रसारमाध्यमांद्वारे माहितीपर घोषणा करून नागरिकांमध्ये जागरूकता वाढविण्यात आली आहे. कुष्ठरोगाची लक्षणे, त्यावरील उपचार मोफत उपलब्ध असल्याची माहिती तसेच रोग पूर्णपणे बरा होऊ शकतो हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात आला आहे.या मोहिमेबाबत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, विनामूल्य तपासणी करून घ्यावी, कुठलीही शंका असल्यास आरोग्य यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन गटविकास अधिकारी नारवटकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. धम्मपाल मुनेश्वर, आरोग्य विस्ताराधिकारी राजीव नागमवाड तालुका कुष्ठरोग तंत्रज्ञ टी. एस. भोसले तसेच तालुका कार्यक्रम सहाय्यक एस. एस. देशमुख यांनी केले आहे.

कुष्ठरोगाविषयीच्या सामाजिक गैरसमजांना दूर करून प्रतिबंध आणि लवकर उपचार हा महत्त्वाचा संदेश तालुक्यातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांतर्फे दिला जात आहे. नागरिकांनी आरोग्य विभागास सहकार्य करून या मोहिमेला यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# चार हजाराची लाच घेणारा भायेगावचा ग्रामसेवक एलसीबीच्या जाळ्यात...

देगलूर /प्रतिनिधी

घरकुल मंजुरीच्या प्रस्तावासाठी चार हजाराची लाच मागणाऱ्या ग्रामसेवकाला एलसीबीने रंगेहात पकडले असून ही कार्यवाही बुधवारी दिनांक १९ रोजी एलसीबी पथकाने पंचायत समिती परिसरात केल्याने खळबळ उडाली आहे. भायेगाव सजयाचे ग्रामसेवक वामन बिरादार यांना एलसीबीने तात्काळ अटक करून त्यांना नांदेडला हलविले आले आहे.

औरंगाबाद येथील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत चे पथक तालुक्यातील मौजे येरगी येथील कामाची पाहणी करण्यासाठी आले असताना ही घटना येथे उघडकीस आल्याने पंचायत समिती प्रशासनात खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील मौजे भायेगाव येथील ग्रामपंचायत सदस्य यांना शासनाच्या योजनेतून घरकुल हवे होते, त्यासाठी त्यांनी घरकुल मंजुरीचा प्रस्ताव ग्रामसेवकाला देण्यासाठी गेले असताना ग्रामसेवक वामन बिरादार यांनी त्या सदस्याकडे चार हजाराची रक्कम लाच म्हणून मागितली. परंतु त्यांची लाच देण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी सरळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे यासंबंधीची तक्रार केली .त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने लाचेची पडताळणी करून बुधवार दिनांक १९ रोजी दुपारी पंचायत समिती कार्यालय परिसरात सापळा लावला. ग्रामसेवकाने तक्रारदात्याकडून चार हजाराची रक्कम स्वीकारताना एलसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या प्रकरणी ग्रामसेवक वामन बिरादार यांना अटक करून नांदेड येथे नेण्यात आले. गुरुवार दिनांक २० रोजी लाचखोर ग्रामसेवकाला बिलोली न्यायालयासमोर हजर करणार असल्याचे सांगण्यात आले.

# पं. नेहरूंची कारकिर्द म्हणजे विकासाभिमुख जडणघडण - दिलीप भडके

**देगलूर - प्रतिनिधी**

**भारत ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त झाला त्यावेळी दारिद्र्य, बेकारी, कुपोषण, सार्वजनिक आरोग्य, निरक्षरता, शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न अशा अनेक समस्या नवस्वतंत्र भारतासमोर होत्या. पंडित नेहरूंनी पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून या विविध समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला,**

अर्थात पंडित नेहरूंची कारकीर्द म्हणजे विकासाभिमुख जडणघडण होय, असे मत उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून दिनांक १४ नोव्हेंबर २५ रोजी आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमात प्रथम पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. दिलीप भडके म्हणाले की, राजकीय पक्षात विविध मतमतांतरे असली तरी देशाचा विकास हाच सर्वपक्षीयांचा व पर्यायाने लोकशाहीचा केंद्रबिंदू असला पाहिजे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी केले तर आभार डॉ. राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक भास्कर कोशीडगेवार यांनी मानले.

# शेतीच्या वादातून ७५ वर्षे वृद्ध महिलेची गळा दाबून हत्या आरोपीना पुणे येथून अटक

नांदेड :- लोहा तालुक्यातील ढगे पिंपळगाव येथे शेतीच्या वादातून ७५ वर्षीय वृद्ध महिलेची गळा दाबून हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे

दि ३ नोव्हेंबर रोजी अहिल्याबाई मसाजी ढगे या महिला शेतात चक्कर येऊन पडल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली होती त्यानुसार पोलीस स्टेशन लोहा येथे अकस्मीत मृत्यूची नोंद करण्यात आली होती मात्र तपास सुरू असताना शवविच्छेदन अहवालात त्यांचा मृत्यू नैसर्गिक नसून गळा दाबून झाल्याची झाल्याचे स्पष्ट झाले यावरून तक्रारदाराच्या जबाबदावरून पोलिसांनी तातडीने तपास चक्री फिरवत मयत महिलेचा नातेवाईक नाव गणेश नारायण ढगे राहणार ढगे पिंपळगाव यांच्याविरुद्ध दिनांक ९ नोव्हेंबर रोजी खुनाचा गुन्हा दाखल केला गुन्हा दाखल होताच लोहा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नौशाद पठाण यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाने आरोपीचा शोध सुरू केला तांत्रिक माहितीच्या आधारे सायबर शाखेच्या मदतीने आरोपी लोणीकंद पुणे येथे असल्याचे निष्पन्न झाले यानंतर वरिष्ठांच्या परवानगीने हे पथक तात्काळ लोणीकंद येथे रवाना झाले पोलिसांचे तपास सूत्रे पथक पुणे येथे पोहोचले असता आरोपी गणेश ढगे हा अरुणाचल प्रदेश येथे पळून जाण्याच्या तयारीत होता पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्याला लोणीकंद येथून ताब्यात घेतले आरोपीला पोलीस स्टेशन लोहा येथे आणून कसून चौकशी केली असता त्याने शेतीच्या वादातून मयत अहिल्याबाई चा खून केल्याचे कबूल केले त्यानुसार पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याला पोलीस कोठडीत घेत अधिक तपास सुरू केला आहे गुन्हा दाखल झाल्यापासून अवघ्या तीन दिवसाच्या आत खुनाच्या आरोपीस अटक करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी तपास पथकाचे विशेष अभिनंदन व कौतुक केले केले आहे या जलदगतीने कारवाई केल्या मुळे लोहा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर जनतेतून समाधानाची प्रतिक्रिया येत आहे .

